[२०२२] २ एस. सी. आर ६०१
सँडोझ प्रायव्हेट लिमिटेड
- विरुद्ध -
युनिअन ऑफ इंडिया आणि इतर
(दिवाणी अपील क्रमांक ३३५८/२०२०)
४ जानेवारी २०२२

[न्यायमुर्ती ए. एम. खानविलकर, दिनेश माहेश्वरी आणि कृष्णा मुरारी]

विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम १९९२: एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) २००९-२०१४- प्रकरण ६ आणि ८-निर्यातीसाठी मंजूर केलेल्या वस्तूंच्या निर्मितीसाठी ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने पुरवलेल्या वस्तूंवर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने दिलेल्या टीईडी (टर्मिनल एक्साईज ड्युटी) च्या परताव्या बाबत दावा-असा निर्णय देण्यात आला. जर परताव्याचा दावा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे करण्यात आला असेल तर त्याला पुरवठा केलेल्या वस्तूंसंबंधी प्राधिकार्यांनी डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांच्या हिशेबाचा मेळ घेऊन एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केल्याप्रमाणे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्राधिकार्यांकडून त्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे, तथापि हे मानीव निर्यातीचे प्रकरण असल्यामुळे-ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) स्वतः टीईडी (टर्मिनल एक्साईज ड्युटी) च्या परताव्यासाठी पात्र नाही. कारण ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून, परिच्छेद ६.२ (बी) सह परिच्छेद ६.११ (सी) (ii) च्या अटींच्या संदर्भात दिलेली प्रारंभिक सूट लक्षात घेता कोणतेही शुल्क प्रदान न करता माल खरेदी करणे किंवा आयात करणे हा आदेश आहे - तथापि ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) वर असे स्पष्ट बंधन असूनही जर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून टीईडी (टर्मिनल एक्साईज ड्युटी) प्रदान करून माल खरेदी करत/केली असेल किंवा आयात केले/करत असेल तर तो केवळ परताव्याचा लाभ जो डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराला परिच्छेद क्रमांक ८.४.२ सह परिच्छेद ८.३ (सी) आणि ८.५ अंतर्गत देण्यात आला होता त्याबाबत अस्वीकरण आणि इतर औपचारिकता आणि आवश्यकतेचे पालन करून डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून परताव्याचा दावा करू शकतो -

टीईडी (टर्मिनल एक्ससाईझ ड्युटी) ची सूट आणि परतावा मिळण्याचा हक्क १९९२ अधिनियम आणि केंद्र सरकारने त्याअंतर्गत तयार केलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या तरतुदींमधून प्रवाहित होतो, जी १९४४ अधिनियम आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांपेक्षा निर्यात आणि परकीय चलन मिळविण्याचा उद्देश असेलेली एक स्वतंत्र योजना आहे, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) विषयाची अंमलबजावणी करणे, संबंधित घटकांच्या परताव्याच्या दाव्याला सामोरे जाणे हे जबाबदार प्राधिकरणाचे कर्तव्य आहे - कारण, हे १९४४ अधिनियम किंवा २००२ नियम किंवा २००४ नियमांनुसार हे परताव्याचे प्रकरण नाही, परंतु संबंधित एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अन्वये – केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, १९४४ – कलम ५ ए - केंद्रीय शुल्क नियम २००२ - केंद्रीय शुल्क नियम २००४ प्रमाणे आहे.

विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम १९९२ : (फॉरेन ट्रेड पॉलिसी) २००९-२०१४- ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) संस्था ज्यांनी डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांकडून विशिष्ट वस्तूंची खरेदी आणि आयात केली होती, ज्यांना एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या [परिच्छेद ६.११ (सी) (२)] अंतर्गत सुरवातीपासून अश्या दायित्वातून सूट मिळाली आहे ते [परिच्छेद क्रमांक ६.२ (बी)] मध्ये नमूद केल्या प्रमाणे शुल्क न भरता (खरेदी आणि आयात करण्यास) पात्र आहेत जे मानीव निर्यात मानले जात आहे - एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ (ए) अंतर्गत, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) योग्य अस्वीकरण सादर करून आणि आवश्यक औपचारिकता आणि अटींचे पालन करण्याच्या अधीन राहून एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून हक्क मिळण्यास पात्र आहे - हे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या हक्कांचे प्रकरण मानता येणार नाही, परंतु डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराला अशी रक्कम अदा केल्याबद्दल ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला फक्त लाभ दिल्या गेला, ज्याला अन्यथा सुरवातीपासून एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद क्रमांक ६.११ (सी) (ii) नुसार शुल्क न भरता परिच्छेद क्रमांक ६.२ (बी) अंतर्गत आयात करण्याच्या बंधनासह सूट देण्यात आली .

शब्द आणि वाक्यप्रयोग : लाभ आणि हक्क- यातील फरक- निर्णय देण्यात आला : “लाभ" त्याच्या प्रकारानुसार, एक फायदा, साहाय्य किंवा मदत आहे, तर “हक्क" म्हणजे काहीतरी मिळवण्याचा अधिकार आहे.

अपीलांचा निपटारा करताना, न्यायालय.

असा निर्णय देण्यात आला - १. केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, १९४४ चे कलम ५ (ए) केंद्र सरकारला विशिष्ट करपात्र मालाच्या संदर्भात उत्पादन शुल्कातून सूट देण्यास सक्षम करतो. सूट देण्याच्या अधिकाराचा वापर हा एक फायद्याचा अधिकार आहे - जो केंद्र सरकारला विशिष्ट मालावरील शुल्क कमी करण्यास किंवा माफ करण्यास विहित केलेल्या अटींवर सक्षम करतो. सवलतीच्या अधिसूचनेला कायदेशीर प्रभाव आहे. तथापि, विशिष्ट मालाचे उत्पादक (डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटसह), जेव्हा त्रयस्थ आसामीद्वारे (ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)) पूर्व अटींची पूर्तता केली जाते, तेव्हा ते देण्यात येणाऱ्या सवलतीच्या लाभाकडे दुर्लक्ष करण्यास मोकळे असतात. तथापि, दिनांक १३.०५.२००५ रोजीच्या सुधारणेद्वारे कलम ५ ए चे उप-कलम (१ ए) समाविष्ट करण्यात आले. तसे शंका दूर करण्यासाठी करण्यात आले. त्यात असे घोषित करण्यात आले आहे की, कोणत्याही उत्पादन शुल्काच्या संदर्भात उपकलम (१) अंतर्गत त्यावर आकारल्या जाणाऱ्या उत्पादन शुल्काच्या संपूर्ण शुल्कातून पूर्णपणे सूट देण्यात आली असेल, तर अशा उत्पादनशुल्कपात्र मालाचा उत्पादक अशा मालावर उत्पादन शुल्क भरणार नाही. ही अट असे नमूद करते की निर्दिष्ट मालावर उत्पादन शुल्क भरावे लागत नाही. मात्र, (कोणत्याही पूर्व अटींशिवाय) उत्पादन शुल्कातून सुरुवातीपासूनच सूट मिळाल्यास ही अट लागू होईल. असे असले तरी, निमायक एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) राजवट १९९२ च्या अधिनियमांतर्गत विशेष योजना म्हणून प्रचलित राहिली पाहिजे. [परिच्छेद १३] [६२२-डी; ६२३-ए-डी].

२. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रस्तावाचे प्रतिपादन करणाऱ्या अधिकाऱ्यांना १९४४ च्या अधिनियमाच्या तरतुदींच्या उद्देशाची आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांची जाणीव होती. असे असूनही, निर्यातीला चालना देणे आणि परकीय चलन मिळवणे या एकमेव उद्देशाने विषयांकित धोरणाचे प्रतिपादन करण्यात आले होते. संबंधित वेळी, निर्यातीला चालना देऊन जागतिक व्यापाराच्या किमान एक टक्का ध्येय साध्य करणे हे उद्दिष्ट धोरणकर्त्यांनी ठरवलेले होते. अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सवलती किंवा असे म्हणता येईल कि, लाभ आणि हक्क हे १९४४ च्या अधिनियमाच्या करप्रणालीच्या तरतुदी आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांद्वारे

संकीर्णित केले जाऊ शकत नाहीत. थोडक्यात सांगायचे तर, १९९२ च्या अधिनियमांतर्गत प्रदान केलेली योजना आणि एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) यांनी स्वतंत्रपणे काम करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे या संदर्भात हे परस्परवर्जक आहे. अन्य कोणताही दृष्टिकोन बाळगणे हे उलट फलदायी ठरून निर्यातीला चालना देण्यासाठी उदारमतवादी एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) तयार करण्यामागील उद्देश हळूहळू कमी होईल. [परिच्छेद १४] [६२३ डी एफ].

३. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) या विषयांतर्गत, प्रकरण ६ हे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट), इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क (ईएचटीपी), सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क (एसटीपी) आणि बायो-टेक्नॉलॉजी पार्क (बीटीपी) यांच्याशी संबंधित आहे. परिच्छेद ६.१ मध्ये पात्रतेच्या निकषाची तरतूद आहे. माल आणि सेवांचे संपूर्ण उत्पादन (डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) मध्ये परवानगी असलेली विक्री वगळता) निर्यात करण्याचे उपक्रम ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) योजनेअंतर्गत स्थापन केले जाऊ शकतात, असे यात अभिप्रेत आहे. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.२ मध्ये ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी मालाची निर्यात आणि आयात यासारख्या व्यवहारांसाठी अटीं निर्दिष्ट केल्या आहेत. परिच्छेद ६.२ (ब) च्या सुरुवातीच्या भागापासूनच हे अगदी स्पष्ट आहे की ते डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) किंवा बंधपत्रित वखारांमधून मालाची आयात आणि/किंवा खरेदी इत्यादींमध्ये गुंतलेल्या विशिष्ट संस्था/घटकांना नियंत्रित करते आणि त्यांनी शुल्क न भरता तसे करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, आयात केलेल्या मालाचा प्रत्यक्ष वापरकर्त्याच्या अटीनुसार वापर करणे आणि निर्यात उत्पादनासाठी वापरणे किंवा उपयोग करणे हे निर्दिष्ट संस्थांवर बंधनकारक आहे. निर्दिष्ट संस्थांनी कोणत्याही अपवादाशिवाय एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत लाभ मिळविण्यासाठी किंवा हक्कांचा लाभ घेण्यासाठी सदर दुहेरी अटींचे पालन करणे आवश्यक आहे. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ६ व्या प्रकरणात असे म्हटले आहे की डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिट्सकडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला होणाऱ्या मालाच्या पुरवठ्याला निर्यात मानली जाणे आवश्यक आहे, जे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ वरून स्पष्ट होते. [परिच्छेद १५, १६] [६२३-जी; ६२४-सी, जी-एच; ६२५-ए].

४. खंड (ए) चा सुरुवातीचा भाग पुरवठाकाराशी संबंधित आहे कारण तो डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटकडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला होणाऱ्या मानीव निर्याती बाबत मानला जातो. पुढे, मानीव निर्यातींचा परिणाम म्हणून, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या हक्कांसाठी पात्र ठरतो. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर, त्याच ६ व्या प्रकरणात, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केल्याप्रमाणे हक्कास पात्र आहे . ही तरतूद एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केलेल्या हक्कांचा लाभ घेण्याच्या पद्धतीशी देखील संबंधित आहे - एकतर डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅरीफ एरिया) युनिट स्वतः द्वारे किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट), माल आणि सेवा प्राप्तकर्ता द्वारे. त्याकरिता, या अटींच्या संदर्भात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) देखील नमूद केलेल्या व्यवहाराच्या संदर्भात डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून योग्य अस्वीकरण प्राप्त केल्यानंतर डीटीए(डोमॅस्टिक ट्रॅरीफ एरिया) युनिटच्या हक्कांच्या बदल्यात अग्रिम परताव्याचा दावा करू शकते. दुसऱ्या शब्दांत, खंड ६.११ [खंड (ए) विशेषतः] डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांशी संबंधित आहे, ज्याचा लाभ डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार स्वतःच घेऊ शकतो किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ज्याला त्या संदर्भात योग्य अस्वीकरण दिल्यानंतर याने माल पुरवला होता. [परिच्छेद १६] [६२६-ए-डी].

५. परिच्छेद ६.११ चा खंड (सी) ही अशी एक तरतूद आहे ज्यामध्ये ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) चा हक्क स्पष्ट करण्यात आला आहे. यामध्ये भारतात निर्मित मालावरील केंद्रीय विक्री कर (सीएसटी) चा परतावा; भारतात निर्मित मालावर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून उत्पादित मालांवरील केंद्रीय उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट; देशांतर्गत तेल कंपन्या/देशांतर्गत सार्वजनिक तेल क्षेत्रांच्या उपक्रमांच्या डेपोमधून खरेदी केलेल्या इंधनावर डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या सवलतीच्या दरानुसार भरलेल्या शुल्काचा परतावा; आणि शेवटी, भरलेल्या सेवा करावर सेनव्हॅट क्रेडिट यांचा समावेश आहे. केंद्रीय उत्पादन शुल्काच्या संदर्भात, परिच्छेद ६.११ (सी) (२) मध्ये भारतात उत्पादित मालावर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून ईओयू

(एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने खरेदी केलेल्या मालावर केंद्रीय उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट दिली आहे. हे परिच्छेद ६.२ (बी) मधील अटींशी सुसंगत आहे, ज्यामध्ये असे भाकीत केले आहे की ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) शुल्क न भरता डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून माल आयात करू शकते. [परिच्छेद १७] [६२६-ई-जी].

६."लाभ आणि हक्क" (“benefit” and “entitlement”) या शब्दप्रयोगात लक्षणीय फरक आहे. “लाभ" हा त्याच्या स्वरूपानुसार एक फायदा, मदत किंवा साहाय्य आहे, तर "हक्क" म्हणजे काहीतरी मिळवण्याचा अधिकार आहे. जो प्रकरण ६ अंतर्गत, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला शुल्क न भरता डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून विशिष्ट माल आयात करण्याचा अधिकार आहे, जो वास्तविक वापरकर्त्याच्या अटींसह इतर आवश्यकता पूर्ण करण्याच्या आणि निर्यात उत्पादनासाठी वापरल्या जाण्याच्या अधीन आहे, कारण ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी ती प्रारंभिक सूट आहे. परिच्छेद ६.११ (अ) च्या स्वरूपात असलेली तरतूद केवळ ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ अंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांच्या संदर्भात दावा मांडण्यास सक्षम करते. एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ अंतर्गत ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी स्वतंत्र हक्क नाही. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, परिच्छेद ६.११ चे शीर्षक जरी "डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून पुरवठ्यासाठी हक्क" असे असले आणि त्याचा खंड (अ) मध्ये जरी अभिप्रेत असेल की डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून योग्य अस्वीकरण सादर केल्यावर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केलेले हक्क मिळवण्यासाठी पात्र ठरेल, तरी ते ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) चे हक्क असल्याचे दर्शवत नाही. तथापि, हे केवळ एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणांतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कासंदर्भात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला हस्तांतरित केलेल्या लाभाचे प्रकरण आहे. [परिच्छेद १९] [६२७-ए-डी]

७.प्रकरण ८ चे शीर्षक 'मानीव निर्यात' आहे. मूळ परिच्छेद ८.१ मध्ये असे निर्दिष्ट करण्यात आले आहे की मानीव निर्यात म्हणजे असे व्यवहार ज्यामध्ये पुरवठा केलेला माल देशाच्या बाहेर जात नाही आणि अशा पुरवठ्यासाठीचा भरणा एकतर भारतीय रुपयांत किंवा मुक्त परकीय चलनात स्वीकारण्यात येतो. सुधारणेच्या दृष्टिकोनातून, त्यात पुढे अशी तरतूद करण्यात आली आहे की, विशिष्ट मालाचा पुरवठा (परिच्छेद ८.२ मध्ये नमूद केलेला) हा मानीव निर्यात मानला जाईल जर मालाची निर्यात भारतात झाली असेल तर. प्रकरण ८ चा परिच्छेद ८.२ पुरवठ्याच्या अशा श्रेणी निर्दिष्ट करतो ज्यांना 'मानीव निर्यात' मानले जाऊ शकते. त्याचा खंड (बी) प्रस्तुत अपीलांना लागू होतो. दुसऱ्या शब्दांत, पुरवठ्याच्या केवळ निर्दिष्ट श्रेणी मानीव निर्यात म्हणून ग्राह्य धरल्या जातात. त्यामध्ये, परिच्छेद ८.२ (बी) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे मालाची आयात जी डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) कडे केली जाते ती 'मानीव निर्यात' मानली जाते. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटद्वारे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला प्रत्यक्ष वापरकर्त्याच्या अटीनुसार आणि निर्यात करण्यात येणाऱ्या मालाच्या उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या मालाचा पुरवठा म्हणजे 'मानीव निर्यात' मानली जाते. अशा व्यवहारांसाठी, संबंधित वेळी लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ मध्ये प्रदान केल्याप्रमाणे काही लाभ देण्यात आले आहेत. [परिच्छेद २०] [६२७-डी -इ ; ६२८- बी,एफ -जी] .

८. परिच्छेद ६.११ (ए) च्या संदर्भात, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केल्यानुसार डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) च्या त्या हक्कांचा लाभ घेऊ शकते, जे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारासाठी राखून ठेवण्यात आले होते. याचा अर्थ असा नाही की ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) स्वतःच्या इच्छेनुसार त्या हक्कांसाठी पात्र आहे, कारण इतर गोष्टींबरोबरच, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून अस्वीकरण प्राप्त करणे हि पूर्वअट बंधनकारक आहे. परिच्छेद ८.२ मध्ये, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाच्या पुरवठ्यासह मानीव निर्यात मानल्या जाणाऱ्या मालाच्या पुरवठ्याच्या श्रेणी सूचीबद्ध केल्या आहेत [परिच्छेद ८.२ (बी)]. परिच्छेद ८.३ मध्ये नमूद केलेले काही लाभ निर्दिष्ट व्यवहारांना

प्रदान केले जातात, जे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत प्रकाशित केलेल्या निदेशपुस्तिकामधील नियम आणि अटींच्या अधीन असतात. परिच्छेद ८.३ (सी) मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अशी कल्पना करण्यात आली आहे की आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोलीच्या विरुद्ध केलेल्या पुरवठ्यासाठी आणि अशा उत्पादकाने अंतिम निर्यातदाराला उत्पादने पुरवली तर आणखी एक आगाऊ अधिकृतता असलेल्या उत्पादकाला देखील टीईडी (टर्मिनल एक्साईज ड्युटी) पासून सूट उपलब्ध आहे. इतर प्रकरणांमध्ये, [ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचे पुरवठाकार इतर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) समाविष्ट असतील], तथापि, टीईडी (टर्मिनल एक्साईज ड्युटी) चा परतावा दिला जाईल. पुढे, "विल" (“will”) हा शब्दप्रयोग अशा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकरांना परतावा देण्याचा आदेश म्हणून मानल्या जाईल, जो एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत त्याचा हक्क आहे. यामुळे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून पुरवठ्याच्या संदर्भात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला देण्यात आलेल्या शुल्क भरण्याच्या सुरुवातीच्या सवलती कमी होत नाहीत. [परिच्छेद २०,२१] [६३२-ई-एच; ६३३-ए].

९. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) नुसार उप-परिच्छेद (ए) आणि (बी) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे आयसीबी (इंटरनॅशनल कॉम्पेटिटिव्ह बिडिंग) आणि आगाऊ अधिकृतता धारकासाठी अंतर्निर्मित पात्रता "श्रेणी" प्रदान करत नाही. उप-परिच्छेद (सी) मधील "इतर प्रकरणांमध्ये" हा शब्दप्रयोग योग्य दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. हे अनुमान्य आहे कि परिच्छेद ८.४.१ ते ८.४.७ नुसार ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या मानीव निर्यात मानल्या जाणाऱ्या पुरवठाकारला लाभ देण्याबाबात उपबंधीत आहे. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केल्याप्रमाणे, तो मूलतः डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराचा हक्क आहे, जो लागू होऊ शकतो. असे दिसून येते की परिच्छेद ८.४.२ च्या जागी २०१२ च्या सुधारित एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) प्रस्थापीत करण्यात आली, जेथे एक तक्ता समाविष्ट करण्यात आला. सदर तक्त्यानुसार, परिच्छेद ८.२ नुसार पुरवठयाच्या विशिष्ठ प्रवर्गासाठी परिच्छेद ८.२ (बी) मध्ये ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठ्यासह समाविष्ट

पुरवठ्यासाठी उपलब्ध लागू लाभ असलेले परिच्छेद ८.३ अंतर्गत विस्तारित करण्यात आले होते. [परिच्छेद २२] [६३३-बी-सी; ६३४-ए].

१०. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (सी) च्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी)/ शुल्क प्रतिग्रहाच्या (ड्रॉबॅकच्या) परताव्यासाठीची पात्रता मूळ परिच्छेद ८.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राप्तकर्त्याद्वारे अशा वस्तूंवर सेनव्हॅट (CENVAT) क्रेडिट/सूट (वटाव) न मिळाल्यावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने सेनव्हॅट क्रेडिट/ सूट (वटाव) चा लाभ घेतला नसल्यास इतर औपचारिकता पाळण्याच्या अधीन राहून एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (बी) अंतर्गत मानीव निर्याती संबंधित लाभ घेता येईल. परिच्छेद ८.४.२ हे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए) (बी) आणि (सी) मध्ये निर्दिष्ट केल्यानुसार, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाच्या पुरवठ्याच्या संदर्भात केवळ (डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया)) पुरवठाकार देण्यात आलेल्या पर्यायाचे सूचक आहे जे २०१२ च्या सुधारणेनंतरही मार्च २०१३ पर्यंत कायम आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की परिच्छेद ८.५ चा तात्पर्यार्थ असा आहे की जर मालावर सेनव्हॅट क्रेडिट/सूट (वटाव) मिळाले नसेल तरच त्या मालाच्या पुरवठ्यावर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा मिळण्यास पात्र असेल. या अटी असे दर्शवतात की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची योजना स्पष्ट आहे आणि संबंधित संस्थांचे लाभ आणि हक्कांच्या संदर्भात संदिग्ध नाही किंवा मूक हि नाही. म्हणून, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या हेतूला पराभूत करण्याची क्षमता लागू असलेल्या युक्तिवादाचा कोणत्याही प्रकारे स्वीकार करण्यात येऊ नये [परिच्छेद २३,२४] [६३४-ए-बी; ६३५-सी-ई].

११. संबंधित कालावधीत लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) योजनेचे अवलोकन केले असता, सदर योजना स्फटिका प्रमाणे स्पष्ट आहे की भारतात निर्मित होणाऱ्या वस्तूंवर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून खरेदी केलेल्या मालावर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट्ट) ला सुरुवातीपासूनच केंद्रीय उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट मिळण्याचा हक्क होता, कारण अशा मालाची आयात शुल्क न भरता करायची होती. तथापि, परिच्छेद ६.११ (ए) मध्ये प्रदान केल्याप्रमाणे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून योग्य अस्वीकरण प्राप्त केल्यावर प्रकरण ८ अंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक

टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांचा लाभ घेण्यापासून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला प्रतिबंधित करता येत नाही. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मिळणारा तो लाभ प्रकरण ८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांशी जोडला गेला होता. डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार परिच्छेद ८.३ (सी) च्या दृष्टीने, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवल्या गेलेल्या वस्तूंच्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा त्यातून सूट प्राप्त झाल्याच्या आधारावर घेऊ शकतो (घेण्यास पात्र आहे). तथापि, टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) ची परतावासाठीची पात्रता, परिच्छेद ८.५ मध्ये नमूद केल्यानुसार, औपचारिकता आणि पालन करावयाच्या आवश्यकतांद्वारे परिसीमित केली गेली आहे. त्यामध्ये, माल प्राप्तकर्ता (ईओयू एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) सेनव्हॅट क्रेडिट किंवा सूट (वटाव) बाबत लाभ घेत नाही. त्याचप्रमाणे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार, जर त्याने सेनव्हॅट क्रेडिट सुविधा/सूट (वटाव) घेतली नसेल तर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (बी) प्रमाणे केंद्रीय उत्पादन शुल्कावरील मानीव निर्यात शुल्क प्रतिग्रहासाठी (ड्रॉबॅकसाठी) पात्र असेल. [परिच्छेद १७] [६३५-एफ-एच; ६३६-ए-बी].

१२. संबंधित परिच्छेद आणि त्याच्या खंडाचे संयुक्त वाचन केल्यावर, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ मधील औपचारिकता आणि अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून परिच्छेद ८.३ (सी) च्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा देऊन डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांना प्रोत्साहित करणे हा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) विषयाचा हेतू होता यात कोणतीही शंका नाही. सदर हेतू हा परकीय चलन निर्माण करण्यासाठी देखील होता कारण निविष्ट माल म्हणून किंवा अन्यथा पुरवल्या गेलेल्या मालाची शेवटी ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे निर्यात केली जात असे. दुसरीकडे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने सूट (वटाव) किंवा सेनव्हॅट क्रेडिट सुविधा (परिच्छेद ८.५ नुसार) घेतली नसेल तरच ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांचा लाभ घेऊ शकेल. दिनांक १५/०३/२०१३ या तारखेचे धोरणा परिपत्रक जारी होईपर्यंत या योजनेचे एकसमान पालन केले गेले. डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवलेला माल हा

मानीव निर्यातीची बाब असल्याने, त्यास सुरुवातीपासूनच उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट देण्यात येते, या गृहीतकावर सदर परिपत्रकाला चालना मिळते. हे सत्य आहे की, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) विषयात असे नमूद केले आहे की विशिष्ट माल ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) किंवा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) मधील बंधपत्रित वाखरांमधून किंवा भारतात आयोजित आंतरराष्ट्रीय प्रदर्शनातून शुल्क न भरता आयात करू शकते. परंतु अशा प्रकारे आयात केलेला माल प्रत्यक्ष वापरकर्त्याच्या नुसार अटीबद्ध असेल आणि त्याचा वापर निर्यात उत्पादनासाठी केला जाईल आणि पुढे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने परिच्छेद ८.५ मध्ये प्रदान केल्याप्रमाणे सूट (वटाव) घेतला नसेल किंवा सेनव्हॅट क्रेडिट सुविधेचा लाभ घेतला नसेल तरच टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) ची सूट मिळू शकते. या आकलनावरून, नमूद केलेले धोरण परिपत्रक जारी होईपर्यंत, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने यापूर्वी परतावा केलेल्या टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परतावासाठीच्या विनंत्यांची दखल विभागाद्वारे घेण्यात येत होती. त्या अर्थाने, किमान डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांसाठी ही सुरुवातीपासूनची सूट नव्हती. त्यामुळे हे परिपत्रक डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांसाठी एक नवीन परिमाण सादर करते. डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठादारांसाठी असा बदल परराष्ट्र व्यापार संयुक्त संचालकांच्या स्वाक्षऱ्यांखाली धोरण परिपत्रक जारी करून केला जाऊ शकत नाही. कारण, केंद्र सरकारने एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद १.२ सह १९९२ च्या कायद्याच्या कलम ५ अंतर्गत (संबंधित वेळी लागू असलेल्या) प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) तयार केली आहे, जी दिनांक २७/०९/२००९ रोजी पासून लागू झाली होती. [परिच्छेद २६] [६३६-बी-डी; ६३७-ई-एच; ६३८-ए-बी] .

१३. मार्च, २०१३ पूर्वी दिनांक १८/०४/२०१३ रोजी केंद्र सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेसह प्राप्त झालेली योजना, अस्तित्वात असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३(सी) आणि ८.४ च्या संबंधित तरतुदींमध्ये सुधारणा केल्या असता डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांच्या तुलनेत त्या भौतिकदृष्ट्या भिन्न होत्या. कारण, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या बाबतीत परिच्छेद ६.११ (सी) (ii) सह परिच्छेद ६.२

(बी) च्या आधारावर दिल्याप्रमाणे, त्यांच्यासाठी ही सुरुवातीपासूनची सूट नव्हती. त्यानुसार, परिच्छेद ८.३ (सी) आणि ८.४ मध्ये दुरुस्ती करून दिनांक १८/४/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे हे उघडपणे स्पष्ट करणे आवश्यक झाले आहे, की यापुढे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारासाठी देखील ही सुरुवातीपासूनची सूट मानली जाईल. खरे तर हा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) मध्ये केलेला बदल किंवा सुधारणा आहे. अशा बदलाला केवळ संभाव्य परिणाम देण्याची गरज आहे, जो प्रत्यायोजित अधिनियमाद्वारे सादर केला जातो. लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांचा निहित हक्क नाकारण्यासाठी धोरण परिपत्रक हा आधार असू शकत नाही. [परिच्छेद २६] [६३८-बी-डी; ६३९-ए].

१४. त्यामुळे, इओयू द्वारे टीइडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्यासाठीच्या दाव्याच्या संबंधात, परिच्छेद ६.११(ए) मध्ये उपबंधित केलेली सूट, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) प्रकरण ८ खाली डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कासह याद्वारे त्याचे नियमन करणे आवश्यक आहे, तथापि त्यावर डीटीए(डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) प्राधिकारणानी नियम २००४ चे नियम ५ खाली देण्यात आलेल्या सेनव्हॅट क्रेडिट च्या परताव्याच्या मुळाशी असलेली तत्वे लक्षात ठेऊन आणि त्याकरिता उपबंधित केलेल्या रीतीने, जरी नियम ५ ने समावेश केलेले नसले तरी, कारवाई करावयास हवी. त्याचे कारण की कायद्यामध्ये ते लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या आधारे मानीव निर्यातीचे प्रकरण आहे. तथापि, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला स्वतःहून टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याचा हक्क नाही, कारण परिच्छेद ६.२ (ब) सह परिच्छेद ६.११ (सी) (ii) च्या संदर्भात दिलेली प्रारंभिक सूट लक्षात घेता, शुल्क न भरता डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून वस्तू खरेदी करणे किंवा आयात करणे हा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) चा आदेश आहे. तसेच, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) वर असे जाहीर बंधन असूनही, जर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) भरून डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅफीक एरिया) पुरवठाकाराकडून वस्तू आयात केल्या असतील, तर ते केवळ परिच्छेद ८.४.२ सह परिच्छेद ८.३ (सी) आणि ८.५ अंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराला प्रदान केलेल्या परताव्याच्या लाभासाठी

त्यासंदर्भात अस्वीकरण मिळविण्याच्या आणि इतर औपचारिकता आणि आवश्यकतांचे पालन करण्याच्या अधीन राहून दावा करू शकतात. अशा प्रकारे, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला स्वतःहून टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याचा दावा करण्याचा अधिकार नाही. तथापि, न्यायालयाने एक सावधान पत्र जोडले आहे की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे नंतर तो लाभ डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारला ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) परत देणार नाही या अटीवर (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठादाराच्या हक्कांचा लाभ घेऊ शकते. कोणत्याही परिस्थितीत, परताव्याच्या दाव्यावर सेनव्हॅट क्रेडिटचा परतावा/उत्पादन शुल्क दायित्वावरील वरील सूट (वटाव) ही अंतर्निहित कार्यपद्धती लक्षात घेऊन प्रक्रिया करणे आवश्यक आहे. जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने वापरलेले सेनव्हॅट क्रेडिट, वटवले जाऊ शकत नसेल, तर रोख रक्कम परत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा परिस्थितीत, रोख रक्कम देण्याऐवजी संबंधित संस्थेच्या सेनव्हॅट क्रेडिट खात्यात सममान रक्कम परत केली जाणे आवश्यक आहे. जर, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) योजनेअंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून परताव्याचा दावा मान्य करण्यात आला असेल आणि जर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रोख स्वरूपात भरलेली असेल तर तो रोख स्वरूपात असू शकतो. अन्यथा, हे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या संबंधित खात्यात सममान सेनव्हॅट क्रेडिट रकमेचे प्रत्यावर्तन करण्याच्या स्वरूपात असू शकते. [परिच्छेद २७, २८, २९, ३०] [६३९-ए-बी; ६४०-ए-डी; ६४१-ए-डी].

१५. डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या परताव्यासाठीच्या दाव्याचा संबंधात त्यावर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खालील प्राधिकाऱ्यांनी एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) प्रकरण ८ मध्ये तपशिलात दिलेल्या अटी जसे की आयात केलेला माल किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरविलेला माल प्रत्यक्ष वापरकर्त्यांच्या अटी नुसार असेल आणि निर्यात उत्पादनासाठी वापरला जाईल आणि ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने त्याला पुरविलेल्या मालाच्या संदर्भात सेनव्हॅट क्रेडिट किंवा सूट (वटाव) घेतला नसेल याचा आशय लक्षात ठेऊन कारवाई करणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे जर डीटीए

(डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने सेनव्हॅट क्रेडिट चा वापर केला असेल, तर सममान रक्कम त्याच्या सेनव्हॅट क्रेडिट खात्यात प्रत्यावर्तीत करणे आवश्यक आहे. तसे केल्यास डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पूर्ववठाकार रक्कम रोखीने परत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. [परिच्छेद ३१] [६४१-डी-एफ].

राजा क्राउन्स अँड कॅन्स प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **२०१५ (३१७) ईएलटी ४०**; लेनोवो (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **(२०१७) ३४६ ईएलटी १२ (मॅड.)** मनाली पेट्रोकेमिकल लिमिटेड -विरुद्ध- अतिरिक्त महासंचालक, परराष्ट्र व्यापार, नवी दिल्ली आणि इतर **रीट.या. क्र. २३१९४ /२००९ निर्णय दिनांक १६.९.२०१९**; युनियन ऑफ इंडिया -विरुद्ध- अल्स्टॉम इंडिया लिमिटेड **२०१५ (३२५) ईएलटी ७२ (दिल्ली);** केंद्रीय उत्पादन शुल्क आयुक्त, दिल्ली II -विरुद्ध- वेलस्प्रिंग युनिव्हर्सल **२०१८ (३५९) ईएलटी ६३५ (दिल्ली)** दीपक एंटरप्रायझेस -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **२०१८ (३६०) ईएलटी ९०५ (दिल्ली)** अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया २०१८ (३६३) ईएलटी ६९ (दिल्ली); मदरसन सुमी इलेक्ट्रिक वायर्स -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **२०१८ (३६४) ईएलटी ९१ (दिल्ली)**; मल्टीटेक्स फिल्टरेशन इंजिनिअर्स लिमिटेड -विरूद्ध- युनियन ऑफ इंडिया **२०२० (३७३) ईएलटी ६८ (दिल्ली);** हिंदुस्थान टिन वर्क्स लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **२०२० (३७३) ईएलटी २१७ (दिल्ली)**; एसर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **२०१८ (३६१) ईएलटी ४४ (कर्नाटक) २२ २००१- मंजूर.** आयएफजीएल (IFGL) रिफ्रॅक्टरीज लिमिटेड-विरुद्ध- संयुक्त महासंचालक, परराष्ट्र व्यापार **२००१ (१३२) ईएलटी ५४५ (कलकत्ता)**; केंद्रीय उत्पादन शुल्क आणि सीमाशुल्क आयुक्त -विरुद्ध- एनबीएमए इंडस्ट्रीज **२०१२ (२७६) ईएलटी ९ (गुजरात)**; केंद्रीय उत्पादन शुल्क आयुक्त -विरुद्ध- शिल्पा कॉपर वायर इंडस्ट्रीज **२०११ (२६९) ईएलटी १७ (गुजरात);** कंडोई मेटल पॉवडर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया **(२०१४) ३०३ ईएलटी २०९ (दिल्ली);** संयुक्त महासंचालक, परराष्ट्र व्यापार -विरुद्ध- आयएफजीएल (IFGL) रिफ्रॅक्टरीज लिमिटेड **२००२ (१४३) ईएलटी २९४ (कलकत्ता)-संदर्भित करण्यात आले .**

१६. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठा करणारा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ (ए) धोरणासह परिच्छेद ८.३ (सी), ८.४.२ आणि ८.५ च्या आधारे सीमाशुल्काच्या परताव्यासाठी हक्कदार होईल. परताव्याची पद्धत, तथापि जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठाकेलेल्या मालाच्या संदर्भात सेनव्हॅट क्रेडिट खात्यामध्ये सममान रक्कम प्रत्यावर्तीत करण्याच्या स्वरूपात असावयास पाहिजे आणि जर त्याने रक्कम रोखीने भरणा केली असेल तर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार मानीव निर्यात योजने खाली शुल्क प्रतिग्रह आणि टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परत करण्यास विलंब झाला असलयास लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) धोरणाच्या परिच्छेद ८.५.१ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे दरसाल दरशेकड ६ टक्के सरळ व्याजदराने रोख स्वरूपातील परताव्यासाठी हक्कदार होईल.

१७. पुढील प्रश्न असा आहे की परताव्यासाठी चा दावा कोणत्या प्राधिकरणासमोर मांडण्यात यावा ? सुटचा हक्क व सीमशुल्क उत्पादनाच्या टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा हा अधिनियम १९९२ च्या तरतुदीपासून व केंद्र सरकारने तयार केलेले एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) धोरण जे अधिनियम १९४४ मध्ये व त्याखाली तयार केलेल्या नियमामध्ये उपबंधित केलेल्या योजनेपेक्षा, निर्यात वाढविण्याच्या व विदेशी चलन मिळविण्याच्या प्रतिज्ञात योजनेसह, एक स्वतंत्र योजना आहे, यातून उत्पन्न होत असल्याने विदेश व्यापार धोरणाची अंमलबजावणी करण्यास जबाबदार प्राधिकरणास संबंधित संस्थांनाच परतव्याची रक्कम मागणी दावे हाताळणे बंधनकारक आहे. कारण ते अधिनियम १९४४ च्या अंतर्गत किंवा नियम २००२ च्या किंवा नियम २००४ खाली परताव्याचे प्रकरण नसून असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खाली लागू आहे आहे. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) संस्था ज्यांनी डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून विनिर्दिष्ट माल प्राप्त करून त्याची आयात केली होती त्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) संस्था त्यांना त्याकरिता सुरवातीपासूनच एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६. ११ (सी) (ii) खाली मानीव निर्यात म्हणून अश्या दायित्वातून प्रारंभापासून सूट देण्यात आलेली असल्यामुळे शुल्क चुकते केल्याविना ६. २ (बी) मध्ये नमूद असल्याप्रमाणे तसे करण्यास

हक्कदार आहेत. याशिवाय लागू आलेल्या एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) खाली ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ची कोणतीही इतर अनुज्ञेयता नाही. खरे तर एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ (ए) खाली ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून यथोचित अस्वीकरण प्रस्तुत केल्यावर आणि आवश्यकत्या औपचारिकतेचे आणि अटींचे पालन करण्याच्या अधीन राहून केवळ डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारच्या अनुज्ञेयतेचा फायदा करून घेण्यासाठी आणखी पात्र आहे. ते प्रकरण ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या अनुज्ञेयतेचे नसेल तर अशी रक्कम डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पूरवठकारास चुकती केलेली असल्यामुळे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) कडे पुढे सरकवलेले लाभ असेल, जे एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.२ (बी) खाली शुल्क चुकते न करता त्याच्या आयात करण्याच्या बंधनासह अन्यथा प्रारंभापासून परिच्छेद ६. ११ (सी) (ii) च्या अनुसार सूट दिल्याचे प्रकरण होते. याव्यतिरिक्त, जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार तसेच ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने प्रश्नास्पद माल आयात करण्यासाठी त्यांचा सेनव्हॅट क्रेडिट सममान रक्कम प्रवत्यावर्तीत करण्याच्या स्वरूपात असेल. तथापि जर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी), ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला लागू असलेल्या एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) ची अंमलबाजवणी करणाऱ्या प्राधिकारणाकडून शुल्क परत करण्यात झालेल्या विलंबासाठी ती दरसाल दरशेकडा ६ टक्के सरळ व्याजसह, ते ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) तसा लाभ असा परतावा (८.५.१) (वटाव) देणे लागतो, अशा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडे पुढे सरकावणार नाही अशा अटींवर, परत मिळू शकतील.[परिच्छेद ४१, ४२, ४३] [६४५-बी-एच].

१८. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करणाऱ्या डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार, लागू असलेल्या एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) सह परिच्छेद ८.४.२ आणि ८.५ च्या अंतर्गत त्यात विनिर्दिष्ट आवश्यक त्या औपचारिकत्यांची पूर्ततेच्या अधीन टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा प्राप्त करण्यास पात्र आहे. जरी, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करण्याऱ्या डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या प्रकरणात जर टीईडी (टर्मिनल

एक्साईझ ड्युटी) चा भरणा सेनव्हॅट क्रेडिटचा वापर करून केला असेल तरी परतावा त्याच्या सेनव्हॅट क्रेडिट खात्यातील सममान रकमेच्या उलट स्वरूपात असेल. जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने १९४४ च्या कायद्यांतर्गत प्राधिकरणाला टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) ची रक्कम रोख स्वरूपात भरणा केली असेल आणि परिच्छेद ८.५.१ नुसार टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याला विलंब झाला असेल तर लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाद्वारे सदर परतावा दरसाल दरशेकडा ६ % सरळ व्याज दराने केला जाईल. [परिच्छेद ४४] [६४६-ए-सी].

१९. दोन्ही प्रकरणांमध्ये, लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याची जबाबदारी १९९२ च्या अधिनियमांतर्गत एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असलेल्या प्राधिकरणाची असेल, ज्याने निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि परकीय चलन मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक असे हक्क/लाभ दिले आहेत. पुढे, संबंधित संस्थेने १९४४ च्या अधिनियमांतर्गत आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार प्राधिकरणाकडे परताव्यासाठी अर्ज केला तो अयशस्वी होता, ही वस्तुस्थिती परस्पर अपवर्जक उपाय म्हणून लागू होऊ शकणाऱ्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा मिळवण्याचा त्याचा हक्क हिरावून घेत नाही. याचे कारण असे निर्धारीती फायदेशीर व्यवस्थेचा अधिक लाभ घेण्यास मुक्त आहे. [परिच्छेद ४५] [६४६-सी-ई].

दिवाणी अपील न्यायाधिकरीता : दिवाणी अपील क्रमांक ३३५८/२०२०.

मुंबई उच्च न्यायालयाच्या रीट याचिका क्रमांक २९२७/२०१५ मधील दिनांक ०१/०८/२०१६ रोजीच्या पारित केलेल्या न्यायनिर्णयाच्या आणि आदेशातील

सह

दिवाणी अपील क्रमांक ३३५९, ३३६० आणि ३७०५/२०२०.

हजर होणाऱ्या पक्षांसाठी वकील : बलबीर सिंग, एएसजी, अरविंद दातार, जय सावला, जी. शिवदास, वरिष्ठ वकील, प्रकाश शाह, जसदीप सिंग ढिल्लन, जस संघवी, राहुल गुप्ता, अक्षय शर्मा, मोहम्मद. अखिल, नवंजय महापात्रा, सुश्री. सुनीता शर्मा, श्रीमती अनिल कटियार, बी. के. प्रसाद, टी. सुंदर रामनाथन, एम. पी. देवनाथ, अबीर रॉय, विवेक शर्मा,

प्रशांत शिवादास, ईशान चक्रबर्ती, विवेक पांडे, रुपेश कुमार, आर. कृष्णन, राजीव शर्मा, सुश्री. नीलम शर्मा, सुश्री. पंखुडी श्रीवास्तव, अलेक्शेंद्रा शर्मा, प्रवेश बहुगुणा.

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर यांच्या द्वारे घोषित करण्यात आला

१. या चार अपीलांपैकी पहिले दोन अपील[१] दिनांक ०१/०८/२०१६[२] रोजी रीट याचिका क्रमांक २९२७/२०१५ आणि रीट याचिका क्रमांक २९२६/२०१५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने[३] पारित केलेल्या संयुक्त न्यायनिर्णय आणि आदेशातून उद्भवतात तर तृतीय अपील[४] दिल्ली उच्च न्यायालय, नवी दिल्ली द्वारे दिनांक ०८/१०/२०१८[५] रोजी रिट याचिका (सी) १०५२६/२०१७ मधील पारित केलेले न्यायनिर्णय आणि आदेशातून तर चौथे अपील[६] कर्नाटक उच्च न्यायालय, बंगळुरू यांनी रिट याचिका क्रमांक २८६/२०१९ (टी - टार) मध्ये दिनांक ०९/१२/२०१९[७] रोजी पारित केलेल्या निकाल आणि आदेशावर टीका केली आहे .

<u>दिवाणी अपील क्रमांक ३३५८/२०२०</u>

२ए. दिवाणी अपील क्रमांक ३३५८/२०२० मधील अपीलकर्त्याने केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा, १९८५ च्या प्रकरण ३० अंतर्गत निर्यात करण्यात येणाऱ्या मालाच्या उत्पादनात शंभर टक्के गुंतलेला ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)[८] असल्याचा दावा केला आहे आणि त्या उद्देशासाठी, अपीलकर्त्याचा भूखंड क्रमांक ८ए/२,८ बी/२,८-८ए/१/१, कलवे, एमआयडीसी, दिघे, नवी मुंबई-४००७०८ येथे कारखाना आहे. याव्यतिरिक्त, अपीलकर्त्याचा आणखी एक कारखाना भूखंड क्रमांक. एल-१, एमआयडीसी., महाड, रायगडयेथे स्थित आहे. जे डोमेस्टिक टॅरिफ एरिया युनिट[९] च्या कक्षेत आहे. याव्यतिरिक्त, अपीलर्त्याचा आणखी एक कारखाना भूखंड क्रमांक. एल-१, एमआयडीसी., महाड, रायगड, डोमेस्टिक टॅरिफ एरिया युनिट च्या कक्षेत स्थित आहे. अपीलकर्त्याने डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) मधील त्याच्या युनिटमधून खरेदी केलेल्या उत्पादन शुल्काच्या संदर्भातटीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी)[१०] च्या परताव्यासाठी अर्ज केला होता, जसे त्याने पूर्वी केले होते आणि २००६ ते २०१२ च्या दरम्यान वेळोवेळी परतावा करण्यात आला होता. मात्र प्रस्तुत परतावा अर्ज नामंजूर करण्यात आला, हाच निर्णय या न्यायालयासमोर आलेल्या अपीलाचा विषय आहे. असे प्रतिपादन करण्यात आले होते की टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) हि डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने भरणा केली होती, जिथून संबंधित कालावधी दरम्यान

संबंधित माल अपीलकर्त्याला त्याच्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी पुरविण्यात आला होता. दिनांक २०/०४/८२०१२ रोजीच्या परताव्याच्या अर्जासह अपीलकर्त्याने घोषणापत्र दाखल केले होते की अपीलकर्त्याच्या डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याच्या फायद्याचा दावा केला नसून सदर अर्जाला डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) ने त्या संदर्भात अस्वीकरण प्रमाणपत्राद्वारे समर्थित केले होते. संपूर्ण अर्ज प्राप्त झाल्या पासून ३० दिवसांच्या आत परताव्यासाठीच्या अर्जाचा निर्णय घेणे आवश्यक होते. अशा प्रकारे त्याचा निपटारा न झाल्याने, अपीलकर्त्याने विकास आयुक्तांना हस्तक्षेप करण्याची आणि आवश्यक ती कारवाई करण्याची विनंती केली. जुलै २०१२ ते सप्टेंबर २०१२ या कालावधीत परताव्याचा दावा सुमारे रु. १,९०,४७,४३७/- (केवळ एक कोटी नव्वद लाख सत्ते चाळीस हजार चारशे सदतीस रुपये) एवढ्या रकमेचा होता आणि ऑक्टोबर २०१२ ते डिसेंबर २०१२ या कालावधीत तो रु. १,३६,०४,८१४/- (केवळ एक कोटी छत्तीस लाख चार हजार आठशे चौदा रुपये) एवढा होता.

२बी. दरम्यान, महासंचालक, परराष्ट्र व्यापार[१२] यांनी, डीजीएफटी(डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड)/विकास आयुक्तांच्या कार्यालयाला डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला केलेल्या मालाच्या पुरवठ्याला सुरुवातीपासून उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट असल्याने टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा कोणताही परतावा देण्यात येऊ नये, असे स्पष्ट करण्यासाठी एका परिपत्रक चा वापर करून दिनांक १५.३.२०१३ [११] रोजीचे धोरणा परिपत्रक (आरई-२०१२/२००९-१४) जारी केले. विकास आयुक्तांनी अखेरीस अपीलकर्त्याने मांडलेला परताव्यासाठीचा दावा फेटाळला आणि त्या संदर्भात अपीलकर्त्याला दिनांक ०१/०४/२०१३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले . विकास आयुक्तांनी अखेरीस अपीलकर्त्याने मांडलेला परताव्यासाठीचा दावा फेटाळला आणि त्या संदर्भात अपीलकर्त्याला दिनांक ०१/०४/२०१३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले .

२ सी. परिणामी, अपीलकर्त्याने मुंबई उच्च न्यायालया समक्ष रिट याचिका क्रमांक ९३१२ /२०१३ दाखल करून डीजीएफटी (डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड) ने जारी केलेल्या नमूद धोरण परिपत्रकाची वैधता आणि विधिग्राह्यता आणि परतावा अर्ज नाकारणाऱ्या विकास आयुक्तांच्या दोन पत्रव्यवहारांना आव्हान दिले.

२ डि. दरम्यान, डीजीएफटी (डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेड) ने दिनांक १८/०४/२०१३[१३] रोजी अधिसूचना क्रमांक (आर. ई.-२०१३)/२००९-२०१४)[१४] जरी केली, ज्यात परदेशी व्यापार (विकास आणि नियमन) कायदा, १९९२[१५] च्या कलम ५ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्र सरकारने परराष्ट्र व्यापार धोरण, २००९-२०१४ मध्ये केलेल्या सुधारणांना अधीसूचित केले.

२ ई. या प्रकरणाचे सर्व पैलू विचारात घेऊन अपीलकर्त्याच्या परताव्यासाठीच्या दाव्यावर नव्याने विचार करण्याचे आणि अपीलकर्त्याला योग्य संधी देण्याचे निर्देश सक्षम प्राधिकरणाला देऊन, अपीलकर्त्याने सादर केलेली नमूद परताव्यासाठीची याचिका दिनांक २३/०९/२०१४ रोजी निकाली काढण्यात आली.

२ एफ. प्रतिप्रेषण आदेशानुसार, विकास आयुक्तांनी वैयक्तिक सुनावणी मंजूर केली, परंतु अखेरीस अपीलकर्त्याचा टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परताव्यासाठीचा दावा क्र. एसईपीझेड- एसईझेड/ डब्ल्यू.पी./ टीईडी/ सँडोज/ ३१४/ २०१३-१४ दि. ०६/०१/२०१५ फेटाळण्यात आला.

२ जी. या निर्णयामुळे व्यथित होऊन, अपीलकर्त्याने मुंबई उच्च न्यायालयासमक्ष रिट याचिका क्रमांक २९२७/२०१५ नव्याने दाखल केली, ज्यामध्ये दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या धोरण परिपत्रकावर आणि विकास आयुक्तांनी पारित केलेल्या दिनांक ०६/०१/२०१५ आदेशावर आक्षेप घेतला. मुंबई उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या धोरण परिपत्रकाला तसेच विकास आयुक्तांनी पारित केलेल्या आदेशाला केलेले आव्हान नाकारले आणि अशा प्रकारे, दिनांक ०१/०८/२०१६ रोजीचा आक्षेपार्ह न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे रिट याचिका फेटाळली. प्रस्तुत निर्णय दिवाणी अपील क्रमांक ३३५८/२०२० मध्ये आव्हानात्मक विषय आहे. याच निर्णयाद्वारे, मुंबई उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याने दिवाणी अपील क्रमांक ३३५९/२०२० मध्ये दाखल केलेली रिट याचिका ज्यामध्ये त्याच मुद्द्याचा समावेश होता ती फेटाळून लावली होती.

<u>दिवाणी अपील क्रमांक. ३३५९/२०२०</u>

३ ए. दिवाणी अपील क्रमांक. ३३५९/२०२० मधील वास्तविक सरणींकडे परत येत, अपीलकर्ता सह अपील प्रमाणेच केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा, १९८५ च्या अनुसूची प्रकरण ३० अंतर्गत येणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीमध्ये शंभर टक्के ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)

गुंतलेला असल्याचा दावा करतो आणि त्या उद्देशासाठी, अपीलकर्त्याचा बी-१५, फेस १-ए, वर्णा, सॉल्सेट, गोवा- ४०३७७२ येथे कारखाना आहे. अपीलकर्त्याचे डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) युनिट अपीलकर्त्याच्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला सवलतीच्या दाव्यानुसार सेनव्हॅट शुल्क भरण्यावर वस्तूंचा पुरवठा करत आहे. अपीलकर्त्याचा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) निर्यातीसाठी मंजूर केलेल्या वस्तूंच्या निर्मितीमध्ये उक्त मालाचा वापर करतो. अपीलकर्त्याने ठामपणे सांगितले की त्याच्या डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅर्रिफ एरिया) युनिटने टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी)अग्रिम परताव्याच्या फायद्यासाठीचा दावा केला नाही आणि अपीलकर्त्याच्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)ला त्याने खरेदी केलेल्या किंवा त्याच्या डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) युनिटने पुरवलेल्या वस्तूंवर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परताव्यासाठीचा दावा करण्यास सक्षम करण्यासाठी त्या संदर्भात अस्वीकरण प्रमाणपत्र सादर केले. अपीलकर्त्याने असा दावा केला आहे की यापूर्वीही त्याने अपीलकर्त्याच्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरविलेल्या वस्तूंवर त्याच्या डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅर्रिफ एरिया) युनिटने दिलेल्या टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परताव्यासाठीचा दावा केला होता आणि विकास आयुक्तांनी तसे मंजूर केले होते. तथापि, या प्रसंगी, अपीलकर्त्याने सादर केलेल्या दिनांक ०८/०८/२०१२ रोजीच्या माहे नोव्हेंबर २०११ साठी टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रक्कम रुपये ६,८७,८९,७३७/- (फक्त सहा कोटी सातत्यांशी लक्ष एकोन्नवद हजार सातशे सत्तर रुपये) परतावासाठीच्या अर्जाच्या विषयासंदर्भात एक वेगळा दृष्टिकोन घेण्यात आला होता. अपीलकर्त्याला कोणतीही संधी न देता, डायरेक्टर जनरल फॉरैन ट्रेड ने जारी केलेल्या धोरणात्मक (आक्षेपीत) परिपत्रकाच्या अंतर्गत हा दावा फेटाळण्यात आला.

३बी. त्यामुळे व्यथित झाल्याने, अपीलकर्त्याने मुंबई उच्च न्यायालयासमक्ष रिट याचिका क्रमांक ९६०७ /२०१३ दाखल करून दिनांक १५/०३/२०१३ च्या धोरण परिपत्रकाची वैधता आणि विधिग्राह्यता यास आव्हान दिले. अपीलकर्त्याने सादर केलेल्या परताव्यासाठीच्या अर्जावर सक्षम प्राधिकरणाला सकारण आदेश देण्याचे निर्देश देऊन सदर याचिकेचा निपटारा करण्यात आला. प्रतिप्रेषण आदेशानुसार, सक्षम प्राधिकरणाने अपीलकर्त्याला वैयक्तिक सुनावणी दिली आणि दिनांक १२/०१/२०१५ रोजीच्या आदेशाद्वारे, अपीलकर्त्याला त्यांच्या डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅर्रिफ एरिया) युनिटमधून ईओयू (एक्स्पोर्ट

ओरिएंटेड युनिट) ला संबंधित वस्तूंचा पुरवठा प्राप्त झाला होता ज्याला प्रारंभीपासूनच परराष्ट्र व्यापार धोरण २००९-२०१४ च्या परिच्छेद ६.११ (सी) (२) खाली शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली होती या आधारावर, त्याचा परताव्यासाठीचा दावा पुन्हा एकदा फेटाळून लावण्यात आला. त्यामुळे, अपीलकर्त्याला परतावा मंजूर काण्यात आला नव्हता.

३सी. अपीलकर्त्याने मुंबई उच्च न्यायालयासमक्ष रिट याचिका क्रमांक २९२६ /२०१५ नव्याने दाखल करून सदर निर्णयाला आव्हान दिले आणि त्याद्वारे डायरेक्टर जनरल, फॉरेन ट्रेड यांनी दिनांक १५/०३/२०१३ रोजी जारी केलेल्या धोरण परिपत्रकाला देखील आव्हान देण्यात आले होते. सदर रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने सुनावणी घेऊन सदर रीट याचिकेस आणखी एक रिट याचिकेसह (जी सॅंडोझ प्रायव्हेट लिमिटेडने दाखल केलेल्या सहयोगी अपीलातील विषय आहे) दिनांक ०१/०८/२०१६ रोजीच्या संयुक्त निकाल आणि आदेशाद्वारे निकाली काढले, ज्यात धोरण परिपत्रकावर केलेला आक्षेप आणि वर नमूद केलेल्या सक्षम प्राधिकरणाने पारित केलेल्या आदेशाला नाकारण्यात आले. सदर न्यायनिर्णय हा दिवाणी अपील क्रमांक ३३५९ / २०२० मध्ये आव्हानात्मक विषय आहे.

४. दोन्ही याचिकांमधील वास्तविक सरींणी समान असल्याने, उच्च न्यायालयाने दिनांक ०१/०८/२०१६ रोजी पारित केलेल्या संयुक्त आक्षेपित निकालात विकास आयुक्तांच्या निर्णयाला आव्हान देण्याच्या कारणांचा विचार केला आणि अखेरीस असे मत व्यक्त केले की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.२ (बी) आणि ६.११ (सी) (२) च्या विचारात घेता डायरेक्टर जनरल, फॉरेन ट्रेड च्या प्रादेशिक प्राधिकरणाद्वारे किंवा विकास आयुक्तांच्या कार्यालयाद्वारे टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा दिला जाऊ शकत नाही कारण अपीलकर्ते- ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला करपात्र मालाच्या खरेदीला सुरुवातीला उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट होती. त्या संदर्भात एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) मध्येच एक स्पष्ट अट असल्याचे निरीक्षण नोंदवले गेले. उच्च न्यायालयाने नमूद केले की आक्षेपीत परिपत्रकाचा उद्देश केवळ उघड स्थिती स्पष्ट करणे हा होता. करपात्र मालाच्या खरेदीच्या वेळी शुल्क भरण्याचे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) वर कोणतेही निर्बंध नव्हते. कारण, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) स्पष्टपणे असे भाकीत करते की उत्पादन शुल्क आकारण्यायोग्य मालाची खरेदी ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे उत्पादन शुल्क न भरता केली जावी. शुल्क न भरता करपात्र माल खरेदी करण्याचे ईओयू

(एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) वर उलट निर्बंध असल्याने परताव्यासाठीचा दावा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की अशा प्रकारे, विकास आयुक्तांनी काढलेला निष्कर्ष एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) मध्ये प्रदान केलेल्या वितरणाशी सुसंगत आहे आणि सदर निष्कर्ष कोणत्याही प्रकारे १९९२ च्या अधिनियमाच्या कलम ५ च्या आदेशाच्या विरुद्ध नाही. पुढे, आक्षेपीत परिपत्रक केवळ एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) मध्ये प्रदान केलेल्या योजेनचा योग्य दृष्टीकोन नोंदवण्यासाठी होते. आक्षेपीत परिपत्रकाचा केवळ संभाव्य परिणाम होऊ शकतो हा युक्तिवाद कायद्याद्वारे मान्य केला जाऊ शकत नाही. त्यामध्ये, हे परिपत्रक केवळ एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.२ (बी), ६.११ (सी) (ii) आणि ८.३ (सी) चा उद्देश स्पष्ट करण्यासाठी होते; आणि जर सदर तरतुदींचे सुसंवादाने आणि संयुक्तपणे वाचन केल्या गेले, तर, शुल्क भरल्यानंतर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे खरेदी केले असले तरीही कर पात्र वस्तूंच्या संबंधित परिच्छेद ८.३ सी अंतर्गत डीजीएफटीसमोर परताव्यासाठीची विनंती कायद्याने अमान्य होईल यात शंका नाही.

५. मुंबई उच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की जारी पूर्वी प्रादेशिक प्राधिकरणाने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ची परताव्यासाठीची विनंती स्वीकारली असली तरी, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या तरतुदींच्या विरोधात काम करण्यासाठी संबंधित सांविधिक प्राधिकारीवर्गास परमादेश जारी करण्यासाठी ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) मध्ये निहित नसलेला कोणताही अधिकार बहाल करू शकत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) मध्ये काही शंका असल्यास ती दूर करण्यासाठी सरकारने १९९२ अधिनियमाच्या कलम ५ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून जारी केलेल्या दिनांक १८/०४/२०१३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे स्थिती पुनर्स्थित केली गेली. खरे तर, मुंबई उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की आक्षेपीत परिपत्रक हे केवळ हे स्पष्ट करण्यासाठी होते की डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेडचे प्रादेशिक प्राधिकरण परताव्यासाठीच्या अर्जाची दखल घेण्यास सक्षम नव्हते आणि जर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) किंवा पुरवठाकार तसे इच्छित असतील तर, जेथे शुल्काची रक्कम जमा करण्यात आली होती किंवा भरणा करण्यात आली होती अशा सक्षम उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांसमोर परताव्यासाठीचा दावा करण्यास ते स्वतंत्र आहेत.

<u>दिवाणी अपील क्रमांक ३३६०/२०२०.</u>

६ए. युनियन ऑफ इंडिया ने या अपीलद्वारे दिल्ली उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय खंडपीठाने रिट याचिका (सी) क्रमांक १०५२६ /२०१७ मध्ये दिनांक ०८/१०/२०१८ रोजी पारित केलेल्या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. सदर रिट याचिकेद्वारे, विविध ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ना ज्याने त्या बदल्यात त्यांचे अंतिम उत्पादन भारताबाहेर निर्यात केले अश्या उत्पादन शुल्क आकारण्यायोग्य मालाचा "पुरवठाकार" असल्याचा दावा करणाऱ्या उत्तरवादीने, डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड च्या विरोधात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) (विमल एग्रो प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि टाटा कॉफी लिमिटेड) ला केलेल्या निर्यातीसाठी रुपये ४६,५४,२९५/- (फक्त छेचाळीस लाख चौपन्न हजार दोनशे नव्वदशे रुपये) च्या रकमेचा टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा देण्याचे निर्देश मागितले. सदर पुरवठा जानेवारी २०१२ ते मार्च २०१३ दरम्यान आणि आक्षेपीत परिपत्रक जारी होण्यापूर्वी केला गेला होता.

६बी. उत्तरवादी-कंपनी (डीटीए युनिट) ने जॉईंट डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड समक्ष परताव्यासाठी अर्ज दाखल केला होता, जो आक्षेपीत परिपत्रकाच्या विचाराचा अंतर्गत त्याला परत करण्यात आला. त्यानंतर अपीलकर्त्याने केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाच्या उपायुक्तांकडे दिनांक ११/०३/२०१४ रोजी परताव्यासाठीचा अर्ज सादर केला जो दिनांक २९/०५/२०१५ रोजी नाकारण्यात आला.या निर्णयाच्या विरोधात, सीमाशुल्क उत्पादन शुल्क आणि सेवा कर अपील न्यायाधिकरण[१६] पर्यंत अपीलात जाऊन हे प्रकरण अयशस्वी झाले. सर्व उपाय संपल्यानंतर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा, १९४४[१७] अंतर्गत संविधीक प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाला अंतिम मान्यता दिल्यानंतर, उत्तरवादी-कंपनीने एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रकमेसंदर्भात परताव्याच्या अर्जाचा विचार करण्यासाठी डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेडच्या विरोधात निर्देश मागण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात परतावा याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला उत्पादन शुल्क आकारण्यायोग्य वस्तूंचा पुरवठाकार असलेल्या उत्तरवादी कंपनीने (डीटीए युनिट) दिलेली टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रक्कम परतावा करण्याची प्राथमिक जबाबदारी डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड ची आहे, असे आवाहन करण्यात आले होते. दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक ०८.१०.२०१८ च्या वादग्रस्त

निकालाद्वारे रिट याचिका मंजूर केली आणि डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड ला उत्तरवादी कंपनीने दाखल केलेल्या परतव्यासाठीच्या अर्जाचा विचार करण्याचे निर्देश दिले आणि जर क्रमवारीत आढळल्यास, उत्तरवादीला दरसाल दरशेकड ९ % टक्के दराने व्याजासह टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) ची रक्कमेचा परतावा करण्याचे निर्देश दिले. दिल्ली उच्च न्यायालय मूलतः त्याच्या आधीच्या निर्णयावर अवलंबून होते. **कंडोई मेटल पॉवडर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया**[१८] ज्याने त्या बदल्यात **सह महासंचालक, विदेश व्यापार (JDGFT) -विरुद्ध- आय.एफ.जी.एल. रिफ्रॅक्टरीज लिमिटेड**[१९] या कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निर्णयाला दुजोरा दिला होता, जो विभागाने लागू केलेल्या आक्षेपीत परिपत्रकाचा केवळ संभाव्य परिणाम होईल या मताला बळकटी देण्यासाठी घेतला होता. त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की **कंडोई मेटल पॉवडर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड**[२०] ही केंद्रीय उत्पादन शुल्क कायदा आणि त्या खाली तयार केलेल्या नियमांनुसार सेनव्हॅट क्रेडिट तरतुदींचा परतावा उपलब्ध असल्याच्या ०४/१२/२०१२ च्या निर्णयाद्वारे पॉलिसी इंटरप्रिटेशन कमिटीने जारी केलेल्या स्पष्टीकरणाशी संबंधित आहे. परताव्यासाठीचा दावा करण्याऐवजी त्याचा लाभ घेतला पाहिजे. १९४४ च्या कायद्याच्या तरतुदींअंतर्गत आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांनुसार उत्तरवादी परताव्याचा लाभ घेऊ शकतो, असा डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ने घेतलेला दृष्टिकोन कायद्याने असमर्थनीय असल्याचे मत मांडण्यात आले. तथ्यांवरून असे निदर्शनास येते की, त्यात नमूद केले आहे की शुल्कपात्र मालाचा पुरवठा दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या आधी चा असल्याने, उत्तरवादी-कंपनीच्या विरोधात परिपत्रक जारी करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. त्याऐवजी, उच्च न्यायालयाने असे म्हटले की परताव्यासाठीच्या अर्जा दिनांक १५/०३/२०१३ च्या आधी होता म्हणून डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ने एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) च्या संदर्भात प्रक्रिया करायला हवी होती. त्यानुसार, रिट याचिका मंजूर करताना, दिल्ली उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याला (डीजीएफटी) उत्तरवादीच्या परताव्यासाठीच्या अर्जाचा विचार करण्याचे आणि दरसाल दरशेकडा ९ टक्के दराने व्याजासह देय रक्कम परत करण्याचे निर्देश दिले.

<u>दिवाणी अपील क्रमांक ३७०५/२०२०.</u>

७. युनियन ऑफ इंडिया ने दाखल केलेली अपील ही कर्नाटक उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय खंडपीठाने रिट अपील क्रमांक २८६/२०१९ (T-TAR) मधील दिनांक ०९/१२/२०१९ च्या निर्णया विरुद्ध आहे. प्रस्तुत अपील हि **एसर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया** [रिट याचिका क्रमांक. ६४५३९/२०१६ (टी-टीएआर)] मध्ये त्याच उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल खंडपीठाच्या न्यायाधीशाच्या दिनांक २०/०३/२०१८[२१] च्या निर्णयाच्या विरोधात अपीलकर्त्या-युनिअन ऑफ इंडिया ने आंतर-न्यायालयीन अपीलाद्वारे दाखल केले होते, ज्यामध्ये उत्तरवादी-कंपनी-जी संगणक प्रणालीचे उत्पादन आणि विक्री करण्याच्या व्यवसायात गुंतलेली असल्याचा दावा करते आणि टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी)च्या देयकावर शंभर टक्के ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)ना वस्तू पुरवते, ती जून २००९ ते ऑक्टोबर २००९ या कालावधीत एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ च्या संदर्भात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)ला पुरविलेल्या वस्तूंच्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रकमेच्या परताव्यास पात्र असल्याचे जाहीर करण्याची मागणी केली होती. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या विद्यमान एकल न्यायाधीशांनी **आय. एफ. जी. एल. रिफ्रॅक्टरीज लिमिटेड - विरुद्ध - सह महासंचालक, विदेश व्यापार**[२२] मधील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या विद्यमान एकल न्यायाधीशांच्या निर्णयाला मान्यता दिली (नंतर त्याच उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय खंडपीठाने**सह महासंचालक, विदेश व्यापार**[२३] मध्ये याची पुष्टी केली) आणि दिल्ली उच्च न्यायालयाने **कंडोई मेटल पॉवडर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड**[२४] मध्ये असे म्हटले होते की एकदा मालाचा पुरवठा मानीव निर्यातीच्या श्रेणीपर्यंत खाली आला की, युनिटला टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याचा हक्क असेल. विद्यमान एकल खंडपीठाच्या न्यायाधीशांनी **लेनोवो (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड - विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया**[२५] मधील मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आणि **सॅंडोझ प्रायव्हेट लिमिटेडच्या** बाबतीत मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला देखील दुजोरा दिला, जो वर नमूद केलेल्या संबंधित अपीलांमध्ये आक्षेपित आहे. तथापि, विद्यमान एकल खंडपीठाच्या न्यायाधीशांनी नमूद केले की मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मद्रास उच्च न्यायालयाने वैशिष्टपूर्ण ठरवले आहे, परंतु नंतर असे निरीक्षण नोंदवले की ते एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) मधील सुधारणांच्या दृष्टीने मुंबई

उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोनाशी सहमत नाहीत. त्याऐवजी, विद्यमान एकल खंडपीठाच्या न्यायाधीशांनी असे मत व्यक्त केले की दिनांक १५/०३/२०१३ रोजीचे धोरण परिपत्रक, कोणत्याही मानकानुसार, स्पष्टीकरणात्मक स्वरूपाचे नव्हते. परिणामत:, विद्यमान एकल खंडपीठाच्या न्यायाधीशांनी परताव्यासाठीची याचिका मंजूर केली आणि परराष्ट्र व्यापार उपसंचालकांनी दिनांक ३१/०३/२०१६ रोजी केलेला संपर्क व्यवहार बाजूला सारून उत्तरवादी -कंपनीचा (डीटीए युनिट) परताव्यासाठीचा दावा नामंजूर केला. विद्यमान एकल न्यायधीश खंडपीठाच्या न्यायाधीशाने सदर आदेश रद्द करतांना उत्तरवादी-कंपनीला एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत सक्षम प्राधिकाऱ्यासमोर उत्तरवादी- कंपनीच्या परताव्यासाठीच्या दाव्याचा पॉलिसीमध्ये उपबंदीत केलेल्या तरतुदीनुसार त्यांचा परताव्यासाठीचा दावा ग्राह्य करण्यासाठी सोपविण्यात आले. द्वि सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने विभागाकडून दाखल केलेल्या अपीलावर सुनावणी घेतानां, आक्षेपित निकालाद्वारे नमूद केले की, उत्तरवादी-कंपनीने जून २००९ ते ऑक्टोबर २००९ पर्यंत,टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या पेमेंटवर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला संगणक प्रणालीचा पुरवठा केला होता जे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या दृष्टीने, विशेषत: परिच्छेद ८.२ (बी), प्रमाणे मानीव निर्यात मानले गेले होते - ज्याचा उत्तरवादी कम्पनी एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) नुसार डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) च्या प्रादेशिक प्राधिकरणाकडून टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा मागण्यासाठी हक्कदार आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या द्वि सदस्यीय खंडपीठाने असे मत व्यक्त केले की विद्यमान एकल न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या न्यायाधीशांनी दिलेल्या मतामध्ये कोणतीही विकलता नाही, अपीलकर्त्याला मानीव निर्यातीचे प्रकरण असल्याने कराच्या मार्गाने देय नसलेली रक्कम राखून ठेवण्यासाठी त्याची सुनावणी घेतली जाऊ शकत नाही. उत्तरवादी-कंपनीने १,०४,३६,९४५ /- रुपयांची रक्कम (फक्त एक कोटी चार लाख छत्तीस हजार नऊशे पंचेचाळीस रुपये) चुकीच्या पद्धतीने भरलेली असल्याने, सदर रकमेचा परतावा करणे आवश्यक होते आणि म्हणूनच, परताव्यासाठीच्या दाव्याचा विचार करण्यासाठी एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खाली प्रतिवादी-कंपनीला सक्षम प्राधिकरणासमोर सोपवण्यात एकल न्यायाधीश खंडपीठाच्या न्यायाधीशाचे निर्णय न्याय्य होते.

८. आम्ही श्री. अरविंद दातार, श्री. जय सावला, विद्वान ज्येष्ठ वकील आणि श्री. प्रकाश शाह, तज्ज्ञ वकील, जे निर्धारीतीच्या अपीलांमध्ये अपीलकर्त्यांची बाजू मांडण्यासाठी उपस्थित असलेले विद्वान वकील, विभागासाठी भारताचे ऍडिशनल सॉलिसिटर जनरल श्री. बलबीर सिंग आणि उत्तरवादी-निर्धारीती (रिट याचिकाकर्त्याचे) विद्वान ज्येष्ठ वकील श्री. जी. शिवदास यांना विभागाच्या अपीलांमध्ये ऐकले आहे.

विचारार्थ

९. संबंधित अपीलांमध्ये वर वर्णन केलेल्या तथ्यात्मक सारणीवरून हे स्पष्ट होते की दिवाणी अपील क्रमांक ३३५८ आणि ३३५९/२०२० ह्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) शी संबंधित आहे, ज्यांनी डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) मधील त्याच्या युनिटमधून वस्तू "खरेदी" केल्या होत्या, जे व्यवहार डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) द्वारे लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी)च्या अर्थाने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मानल्या गेलेल्या निर्यातीच्या स्वरूपाचे होते. दुसरीकडे, दिल्ली उच्च न्यायालय आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध अपील डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) संबंधित ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला वस्तूंचे "पुरवठाकार", तसेच त्याच विदेश व्यापार धोरणाच्या (एफटीपी) संदर्भात स्थापन केलेल्या परताव्याच्या दाव्याशी संबंधित आहेत.

१०. प्रश्न असा आहे की, खरेदी केलेल्या किंवा पुरवल्या गेलेल्या, उदाहरणार्थ, निर्यात मानल्या जाणाऱ्या विशिष्ट मालाच्या संदर्भात, टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) साठी कथितपणे दिलेल्या रकमेचा परतावा मिळण्याचा अधिकार या संस्थांना आहे का आणि जर मानीव निर्यात असेल तर लागू असलेल्या फॉरेन ट्रेड पॉलिसी (एफटीपी) किंवा १९४४ च्या कायद्यांतर्गत कोणत्या प्राधिकरणाकडून आहे? पुढे, १५/०३/२०१३ दिनांकित परिपत्रक क्रमांक १६ (आरई-२०१२/२००९-१४) हे केवळ टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा आणि सूट आणि त्याची परिणामकारकता याबाबत स्पष्टीकरणात्मक आहे का?

११. संदर्भानुसार, विशिष्ट वस्तूंचा प्राप्तकर्ता किंवा पुरवठाकार असलेल्या संबंधित संस्थांच्या टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रक्कमेच्या परताव्याचा दावा, व्यवहाराचे स्वरूप आणि १९९२ चे अधिनियम आणि १९४४ च्या अधिनियमान्तर्गत प्रस्तावित एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी)या संबंधित कायद्यांच्या तरतुदींच्या लागू होण्याच्या संदर्भात, दोन व्यापक बाबीं समजून घेणे आणि त्यांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. आपण योग्य ठिकाणी या पैलूचे

विवेचन करू. हे लक्षात घेतले पाहिजे की संबंधित अपीलांमधील परताव्यासाठीचा दावा जून २००९ आणि मार्च२०१३ दरम्यान बदलतो (म्हणजे, दिवाणी अपील क्रमांक ३३५८ /२०२० - जुलै २०१२ आणि डिसेंबर २०१२; दिवाणी अपील क्रमांक ३३५९ /२०२० -नोव्हेंबर २०११; दिवाणी अपील क्रमांक ३३६०/२०२० -जानेवारी २०१२ आणि मार्च २०१३; आणि दिवाणी अपील क्रमांक ३७०५ /२०२० -जून २००९ आणि ऑक्टोबर २००९).

१२. सुरुवातीला, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की या सर्व प्रकरणांमधील संस्था एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) वर आधारित परताव्यासाठीचे दावे आहेत आणि अधिनियम १९४४ च्या तरतुदींच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या, विशेषतः केंद्रीय उत्पादन शुल्क नियम, २००२[२६] आणि सेनव्हॅट क्रेडिट रूल्स २००४[२७] च्या संदर्भात नाही.

१३. जर १९४४ च्या अधिनियमाच्या अंतर्गत शुल्क परताव्यासाठीचा दावा केला असता, तर तो त्या अधिनियम कलम ११ बी मध्ये नमूद केलेल्या तरतुदी खाली नियंत्रित केला गेला असता. २००२ च्या नियमांच्या नियम २ (ई) मध्ये 'शुल्क' या शब्दाची व्याख्या १९४४ च्या अधिनियमाच्या च्या कलम ३ अंतर्गत 'देय शुल्क' म्हणून करण्यात आली आहे. १९४४ च्या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये अशी कल्पना करण्यात आली आहे की, चौथ्या अनुसूचीत नमूद केलेल्या दरानुसार भारतात उत्पादित किंवा निर्मित होणाऱ्या सर्व उत्पादनीय मालावर (विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये उत्पादित किंवा निर्मित माल वगळता) केंद्रीय वर्धित मूल्य (सेनव्हॅट) म्हणून ओळखला जाणारा उत्पादन शुल्क विहित केलेल्या पद्धतीने आकारला जाईल आणि गोळा करण्यात येईल. १९४४ च्या अधिनियमाच्या कलम ५ए[२८] चा संदर्भ घेणे योग्य ठरेल. हे केंद्र सरकारला विशिष्ट करपात्र मालाच्या संदर्भात उत्पादन शुल्कातून सूट देण्याचे अधिकार देते. सूट देण्याच्या अधिकाराचा वापर हा एक फायदेशीर अधिकार आहे- जो केंद्र सरकारला विहित केलेल्या अटींवर विशिष्ट मालावरील शुल्क कमी करण्यास किंवा माफ करण्यास सक्षम करतो. सवलतीच्या अधिसूचनेला वैधानिक आधार आहे. तथापि, विशिष्ट वस्तूंचे उत्पादक (डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) युनिटसह), जेव्हा त्रयस्थ असामीद्वारे (ईओयू(एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)) पूर्व अटींची पूर्तता केली जाते, तेव्हा दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या लाभाकडे दुर्लक्ष करण्याची त्यांना मोकळीक असते. तथापि, दिनांक १३/०५/२००५ च्या सुधारणेपासून कलम ५ए मध्ये उपकलम (१ए) समाविष्ट करण्यात आले. ते शंका दूर करण्यासाठी होती. त्यात असे घोषित करण्यात आले आहे की, कोणत्याही

उत्पादन शुल्काच्या संदर्भात उपकलम (१) अंतर्गत त्यावर आकारल्या जाणाऱ्या उत्पादन शुल्काच्या संपूर्ण शुल्कातून पूर्णपणे सूट देण्यात आली असेल, तर अशा उत्पादन शुल्क आकारण्यायोग्य मालाचा उत्पादक अशा मालावर उत्पादन शुल्क भरणार नाही. या अटीनुसार, विशिष्ट मालावर उत्पादन शुल्क भरावे लागत नाही. मात्र, सुरुवातीपासूनच (कोणत्याही पूर्व अटींशिवाय) उत्पादन शुल्कातून सूट मिळाल्यास ही अट लागू होईल. असे असले तरी, प्रशासकीय एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) १९९२ च्या अधिनियमांतर्गत विशेष सवलत म्हणून प्रचलित राहिली पाहिजे.

१४. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) चा प्रस्ताव मांडणाऱ्या अधिकाऱ्यांना १९४४ च्या अधिनियमाच्या तरतुदींच्या उद्देशाची आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांची जाणीव होती. असे असूनही, निर्यातीला चालना देणे आणि परकीय चलनाची कमाई करणे या एकमेव उद्देशाने विषयांकीत धोरण प्रस्तावित केले गेले होते. संबंधित वेळी, निर्यातीला चालना देऊन जागतिक व्यापाराचे किमान एक टक्का उद्दिष्ट साध्य करणे हे धोरणकर्त्यांनी ठरवलेले उद्दिष्ट होते. अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सवलती, लाभ आणि हक्क हे १९४४ करप्रणाली च्या अधिनियमातील तरतुदी आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांद्वारे मर्यादित केले जाऊ शकत नाहीत. थोडक्यात सांगायचे तर, १९९२ च्या अधिनियमांतर्गत प्रदान केलेली तरतूद आणि एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) यांनी स्वतंत्रपणे काम करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे या संदर्भात ते परस्पर अनन्य आहे. अन्य कोणताही दृष्टिकोन बाळगणे हे प्रतिउत्पादक ठरेल आणि निर्यातीला चालना देण्यासाठी उदारमतवादी एएफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) तयार करण्यामागील हेतू कमी करेल.

१५. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) या विषयांतर्गत, प्रकरण ६ ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट), इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क (ईएचटीपी), सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क (एसटीपी) आणि बायो-टेक्नॉलॉजी पार्क (बीटीपी) यांच्याशी संबंधित आहे. परिच्छेद ६.१ मध्ये पात्रतेच्या निकषाची तरतूद आहे. ज्यात असा दृष्टिकोन आहे की संपूर्ण माल व सेवा उत्पादनाची निर्यात करणारे युनिट (डीटीए मधील अनुज्ञेय विक्री वगळता) इओयू योजने अंतर्गत प्रस्थापित होऊ शकेल. त्यात नमूद केलेल्या इतर पार्क्सबाबतही अशीच तरतूद करण्यात आली आहे. तथापि, हे स्पष्ट केले जाते की व्यापारी घटक या योजनांमध्ये समाविष्ट नाहीत.

"परिच्छेद ६.१ (पात्रता) :

माल आणि सेवा यांचे संपूर्ण उत्पादन (डीटीए डोमेस्टिक टॅरीफ एरिया मधील अनुज्ञेय विक्री वगळता) निर्यातीचा उपक्रम करणारी युनिट्स, एक्सपोर्ट ओरिएंटेड युनिट (EOU) योजनेअंतर्गत, इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क (EHTP) योजनेअंतर्गत, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क (STP) योजनेअंतर्गत किंवा बायो-टेक्नॉलॉजी पार्क (BTP) योजनेअंतर्गत प्रस्थापित करता येईल, ज्यात वस्तूंच्या उत्पादनासह दुरुस्ती, पुनर्निर्मिती, पुनर्रचना, पुनर्र-अभियांत्रिकीकरण आणि सेवा प्रदान करणे हे सर्व समाविष्ट आहे. व्यापारी घटक या योजनांच्या कक्षेत समाविष्ट नाहीत."

१६. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.२ मध्ये ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी मालाची निर्यात आणि आयात यासारखे व्यवहार करण्यासाठीच्या अटी निर्दिष्ट केल्या आहेत. इतर गोष्टींबरोबरच, प्रस्तुत अपीलांचा विचार करण्यासाठी संबंधित कलम परिच्छेद ६.२ (बी) आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की :

" ६.२ मालाची निर्यात आणि आयात

(ए)..................

(बी) **ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)** /ईएचटीपी (इलेक्ट्रॉनिक हार्डवेयर टेकनॉलॉजि पार्क)/एसटीपी (सॉफ्टवेयर टेकनॉलॉजि पार्क) /बीटीपी (बायो-टेकनॉलॉजि पार्क) युनिट्स भारतात आयोजित डीटीए (आंतरराष्ट्रीय प्रदर्शनातील **डीटीए** (डोमेस्टिक टर्रीफ एरिया) किंवा बंधपत्रित वखारांमधून, **शुल्क न भरता**, आयटीसी (एचएस) मधील आयातीच्या प्रतिबंधित वस्तू नसल्यास, त्याच्या व्यवहारांसाठी आवश्यक असलेल्या भांडवली वस्तूंसह सर्व प्रकारच्या वस्तू **आयात** आणि/किंवा **खरेदी** करू शकते. इतर कोणत्याही कायद्यांतर्गत आयातीसाठी आवश्यक असलेली कोणतीही परवानगी लागू होईल. मान्यताप्राप्त उपक्रमासाठी आवश्यक असलेल्या भांडवली वस्तूंसह ग्राहकांकडून विनामूल्य किंवा कर्ज/भाडेपट्टीवर वस्तू आयात करण्याची परवानगी देखील युनिट्सना देण्यात येईल. भांडवली वस्तूंची आयात स्वयंप्रमाणनाच्या आधारावर असेल. **युनिटद्वारे आयात**

केलेला माल प्रत्यक्ष वापरण्याच्या स्थितीत असावा आणि त्यांचा वापर निर्यात उत्पादनासाठी केला जावा.

..........”

(भर देण्यात आला)

या तरतुदीच्या सुरुवातीच्या भागापासूनच हे अगदी स्पष्ट आहे की डीटीए (डोमेस्टिक टॅर्रीफ एरिया) किंवा बंधपत्रित गोदामांमधून मालाची आयात आणि/किंवा खरेदी इत्यादींमध्ये गुंतलेल्या विशिष्ट संस्था/घटकांना ते नियंत्रित करते आणि त्यांनी शुल्क न भरता असे करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, आयात केलेल्या मालाचा प्रत्यक्ष वापरकर्त्याच्या अटीनुसार वापर करणे आणि निर्यात उत्पादनासाठी वापरणे किंवा वापरला जाणे हे निर्दिष्ट संस्थांवर बंधनकारक आहे. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत लाभ मिळविण्यासाठी किंवा हक्कांचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही अपवादाशिवाय निर्दिष्ट संस्थांनी या दुहेरी अटींचे पालन करणे आवश्यक आहे. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ६ व्या प्रकरणात असे म्हंटले आहे की डीटीए (डोमेस्टिक टॅर्रीफ एरिया) युनिट्सकडून कडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला वस्तूंचा पुरवठा हि मानीव निर्यात मानली पाहिजे, जे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ वरून स्पष्ट होते, ते खालील प्रमाणे ----

“ ६.११ डीटीए (डोमेस्टिक टॅर्रीफ एरिया) कडून पुरवठ्याचा हक्क.

ए) डीटीए (डोमेस्टिक टॅर्रीफ एरिया) कडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)/ ईएचटीपी (इलेक्ट्रॉनिक हार्डवेयर टेकनॉलॉजि पार्क)/ एसटीपी (सॉफ्टवेयर टेकनॉलॉजि पार्क)/ बीटीपी (बायो-टेकनॉलॉजि पार्क) यांना होणारा पुरवठा **'मानीव निर्यात'** म्हणून ओळखला जाईल आणि **डीटीए (डोमेस्टिक टर्रीफ एरिया) पुरवठाकारावर निर्यात दायित्व असल्यास आणि ते पार पाडल्यास एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकारणांतर्गत संबंधित हक्कांसाठी पात्र असेल. वरील गोष्टी असूनही, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)/ईएचटीपी (इलेक्ट्रॉनिक हार्डवेयर टेकनॉलॉजि पार्क) /एसटीपी (सॉफ्टवेयर टेकनॉलॉजि पार्क) /बीटीपी (बायो-टेकनॉलॉजि पार्क) युनिट्स यांनी डीटीए (डोमेस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराकडून योग्य अस्वीकरण सादर केल्यावर, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केलेल्या हक्कांसाठी पात्र ठरतील. मानीव निर्यात** शुल्कप्रतिग्रह (duty drawback)

चा दावा करण्यासाठी, जिथे सर्व उद्योगांचे प्रतिग्रहाचे दर उपलब्ध नसतील तिथे त्यांना डीसी द्वारे निश्चित केलेले ब्रँड दर मिळतील.

(ब) डीटीए (डोमेस्टिक टर्रीफ एरिया) पासून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) पुरवठाकार मौल्यवान आणि अर्ध-मौल्यवान रत्न, कृत्रिम रत्न आणि प्रक्रिया केलेल्या मोत्यांचे पुरवठाकार निदेशपुस्तक प्रक्रिया खंड १ [(एच बी पी व्ही १) हॅन्ड बुक व प्रोसिजर्स व्ही १] मध्ये नमूद केलेल्या दरांवर आणि मालासाठी पुनःपूर्ती अधिकृतता देण्यास पात्र असतील.

(सी) **ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)/ईएचटीपी (इलेक्ट्रॉनिक हार्डवेयर टेकनॉलॉजि पार्क)/एसटीपी (सॉफ्टवेयर टेकनॉलॉजि पार्क) /बीटीपी (बायो- टेकनॉलॉजि पार्क) युनिट्स खालील बाबींसाठी पात्र असतील :-**

(i) भारतात उत्पादित वस्तूंवरील केंद्रीय विक्री कर (सीएसटी) ची परतफेड.

संपूर्ण अर्ज मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत प्रकरण निकाली न निघाल्यास (निदेशपुस्तक प्रक्रिया, खंड १ (एचबीपी व्ही१) - हँडबुक ऑन प्रोसिजर्स व्ही १) च्या परिच्छेद ९.१०.१ नुसार) सीएसटीच्या अग्रिम परताव्याला विलंब झाल्यास दरसाल दरशेकडा ६ टक्के दराने सरळ व्याज दिले जाईल.

(ii) भारतात उत्पादित वस्तूंवर डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया)कडून खरेदी केलेल्या वस्तूंवर केंद्रीय उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट.

(iii) देशांतर्गत तेल कंपन्या/देशांतर्गत तेल सरकारी क्षेत्र उपक्रमांकडून खरेदी केलेल्या इंधनावर डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या सवलतीच्या दरानुसार भरलेल्या शुल्काची परतफेड. वित्त कायद्यांतर्गत इंधनावरील अतिरिक्त उत्पादन शुल्काची परतफेड देखील स्वीकारार्ह असेल.

(iv) भरलेल्या सेवा करावर सेनव्हॅट क्रेडिट."

(भर देण्यात आला)

खंड (अ) चा सुरुवातीचा भाग पुरवठाकाराशी संबंधित आहे कारण तो डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) युनिटकडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला होणाऱ्या पुरवठ्यास मानीव निर्यात मानले जाते. पुढे, मानीव निर्यातचा परिणाम म्हणून, डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी)च्या प्रकरण ८ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या हक्कांसाठी पात्र बनतो. वेगळ्या अर्थाने सांगायचे तर,

त्याच्याच प्रकरण ६ मध्ये, एफटीपी च्या प्रकरण ८ अंतर्गत डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्काच्या संबंधात निर्देश केले आहे. ही तरतूद एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या हक्कांचा लाभ घेण्याच्या पद्धतीशी देखील संबंधित आहे- एकतर डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) युनिट किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे, वस्तू आणि सेवा प्राप्तकर्ता. कारण, या अटीनुसार, डीटीए पुरवठादाराकडून योग्य अस्वीकरण प्राप्त केल्यानंतर, डीटीए युनिटच्या हक्काच्या बदल्यात, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) देखील नमूद केलेल्या व्यवहाराच्या संदर्भात परताव्यासाठीचा दावा दाखल करू शकते. दुसऱ्या शब्दात, खंड ६.११ [विशिष्टतः त्याचा खंड (ए)] डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्काशी संबंधित आहे, ज्याचा लाभ डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार स्वतः घेऊ शकतो किंवा त्या संदर्भात योग्य अस्वीकरण दिल्यानंतर ज्या ईओयूला त्याने वस्तूंचा पुरवठा केला होता, ते ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराचे हक्क एफटीपी च्या प्रकरण ८ मध्ये वर्णन केले गेले आहेत, ज्यासंबंधी आम्ही थोड्या वेळात निर्देश देऊ. प्रकरण ६.११ च्या खंड (ए) मध्ये अशी तरतूद आहे की डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार आणि ईओयू तसेच डीसीने निश्चित केलेल्या दरांनुसार, जेथे सर्व इंडस्ट्री रेट्स ऑफ ड्रॉबॅक उपलब्ध नसतील तेथे मानीव निर्यात शुल्कप्रतिग्रहसाठीचा दावा करू शकतात.

१७. परिच्छेद ६.११ चा खंड (सी) ही ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) चे हक्क स्पष्ट कारणारी एक तरतूद आहे. त्यात भारतात उत्पादित मालावर केंद्रीय विक्री कर (सिएसटी) ची प्रतिपूर्ती समाविष्ट आहे; भारतामध्ये उत्पादित केलेल्या मालावर डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) मधून उत्पादित केलेल्या मालावर केंद्रीय उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट; डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या करप्रतिग्रह दरानुसार देशांतर्गत तेल कंपन्या/देशांतर्गत तेल सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या डेपोकडून खरेदी केलेल्या इंधनावर भरलेल्या शुल्काची परतफेड; आणि शेवटी, भरलेल्या सेवा करावरील सेन्व्हॅट क्रेडिट, चा समावेश आहे. केंद्रीय विक्री कर (सिएसटी) च्या संबंधात, परिच्छेद ६.११ (सी) (ii) असे गृहीत धरते कि, भारतामध्ये उत्पादित केलेल्या मालावर डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया)

कडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे खरेदी केलेल्या माला वर केंद्रीय उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट प्रदान करते. हा परिच्छेद ६.२ (बी) मधील अटींशी सुसंगत आहे, ज्यामध्ये असे भाकीत केले आहे की ईओयू शुल्क न भरता डीटीए कडून वस्तू आयात करू शकते.

१८. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ६ च्या योजनेवरून, हे स्पष्ट आहे की ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठादाराकडून वस्तू आयात करू शकते, ज्याचा व्यवहार, विधितः मानीव निर्यात समजले जाते; आणि ते शुल्क न भरता असे करू शकते, कारण ते त्याला एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११(सी)(ii) मध्ये सूट देण्यात आली आहे. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) स्वतः हुन कुठल्याही हक्कासाठी पात्र राहणार नाही.

१९. हे म्हणणे व्यर्थ आहे कि, "लाभ"[२९] आणि "हक्क"[३०] ("benefit" and "entitlement") या शब्दप्रयोगात लक्षणीय फरक आहे. "लाभ" हा त्याच्या स्वरूपानुसार एक फायदा, मदत किंवा साहाय्य आहे, तर "हक्क" म्हणजे काहीतरी मिळवण्याचा अधिकार आहे. जो प्रकरण ६ अंतर्गत, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला शुल्क न भरता डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून विशिष्ट माल आयात करण्याचा अधिकार आहे, जो वास्तविक वापरकर्त्याच्या अटींसह इतर आवश्यकता पूर्ण करण्याच्या आणि निर्यात उत्पादनासाठी वापरल्या जाण्याच्या अधीन आहे, कारण ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी ती प्रारंभिक सूट आहे. परिच्छेद ६.११ (अ) च्या स्वरूपात असलेली तरतूद केवळ ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ अंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांच्या संदर्भात दावा मांडण्यास सक्षम करते. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ अंतर्गत ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) साठी स्वतंत्र हक्क नाही. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, परिच्छेद ६.११ चे शीर्षक जरी "डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) कडून पुरवठ्याचा हक्क" असे असले आणि त्याचा खंड (अ) मध्ये जरी अभिप्रेत असेल की डीटीए पुरवठाकाराकडून योग्य अस्वीकरण सादर केल्यावर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केलेले हक्क मिळवण्यासाठी पात्र ठरेल, तरी ते ईओयू चे हक्क असल्याचे दर्शवत नाही.

तथापि, हे केवळ एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणांतर्गत डीटीए पुरवठाकाराच्या हक्कासंदर्भात ईओयू ला हस्तांतरित केलेल्या लाभाचे प्रकरण आहे.

२०. ८ व्या प्रकरणाचे शीर्षक 'मानीव निर्यात' आहे. मूळ परिच्छेद ८.१ मध्ये असे निर्दिष्ट करण्यात आले आहे की मानीव निर्यात म्हणजे असे व्यवहार ज्यामध्ये पुरवठा केलेला माल देशाच्या बाहेर जात नाही आणि अशा पुरवठ्यासाठीचा भरणा एकतर भारतीय रुपयांत किंवा मुक्त परकीय चलनात स्वीकारण्यात येतो. सुधारणेच्या दृष्टिकोनातून, त्यात पुढे अशी तरतूद करण्यात आली आहे की, विशिष्ट मालाचा पुरवठा (परिच्छेद ८.२ मध्ये नमूद केलेला) हा मानीव निर्यात मानला जाईल जर मालाची निर्यात भारतात झाली असेल तर. मूळ परिच्छेद ८.१ खालीलप्रमाणे आहे :

"**८.१. मानीव निर्यात**

“मानीव निर्यात अशा व्यवहारांकडे निर्दिष्ट करते ज्यामध्ये पुरवठा केलेला माल देशाच्या बाहेर जात नाही आणि अशा पुरवठ्यासाठीचा भरणा एकतर भारतीय रुपयांत किंवा मुक्त परकीय चलनात घेण्यात येतो.”

[२०१२-२०१३ मध्ये सुधारणा नंतर परिच्छेद ८.१., खालीलप्रमाणे आहेः-

"**८.१. मानीव निर्यात**

“मानीव निर्यात अशा व्यवहारांकडे निर्दिष्ट करते ज्यामध्ये पुरवठा केलेला माल देशाच्या बाहेर जात नाही आणि अशा पुरवठ्यासाठीचा भरणा एकतर भारतीय रुपयांत किंवा मुक्त परकीय चलनात घेण्यात येतो. **खालील परिच्छेद ८.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मालाचा पुरवठा जर माल भारतात उत्पादित केला असेल तर, 'मानीव निर्यात' म्हणून समजला जाईल."**]

(सुधारणा ठळक करण्यात आल्या आहेत)

प्रकरण ८ चा परिछेद ८.२ मानीव निर्यात म्हणून मानले जाऊ शकणाऱ्या पुरवठ्याचे प्रवर्ग विनिर्दिष्ट करते. त्याचे खंड (ब) प्रस्तुत अपीलांना लागू होते. मूळ परिच्छेद ८.२ चा संबंधित उतारा खालीलप्रमाणे आहेः

"**८.२. पुरवठ्याचे प्रवर्ग**

मुख्य/उप-कंत्राटद्वारा केलेल्या मालाच्या पुरवठ्याच्या खालील प्रवर्गांना, जर

माल भारतात उत्पादित केला असेल तर, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत 'मानिव निर्यात' म्हणून मानण्यात येईल :

(ए) xxx xxx xxx

(बी) ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)/एसटीपी (सॉफ्टवेअर टेकनॉलॉजी पार्क)/ईएचटीपी (इलेकट्रोनिक्स हार्डवेअर टेकनॉलॉजी पार्क) /बीटीपी (बायॉ- टेकनॉलॉजी पार्क) ला मालाचा पुरवठा;

......."

[२०१२-२०१३ मधील दुरुस्तीनंतर परिच्छेद ८.२., खालीलप्रमाणे आहेः-

"**८.२. पुरवठ्याचे प्रवर्ग**

मुख्य/उप-कंत्राटदारद्वारा केलेल्या मालाच्या पुरवठ्याच्या खालील प्रवर्गांना एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत 'मानीव निर्यात' म्हणून मानण्यात येईल:

(ए) xxx xxx xxx

(बी) ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)/एसटीपी (सॉफ्टवेअर टेकनॉलॉजी पार्क)/ईएचटीपी (इलेकट्रोनिक्स हार्डवेअर टेकनॉलॉजी पार्क) /बीटीपी (बायॉ- टेकनॉलॉजी पार्क) ला मालाचा पुरवठा;

......."]

दुसऱ्या शब्दांत, पुरवठ्याच्या विनिर्दिष्ट प्रवर्गांनाच केवळ मानीव निर्यात म्हणून मानण्यात आले आहे. त्यामध्ये, डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला परिच्छेद ८.२ (बी) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे केलेली मालाची आयात ही मानीव निर्यात म्हणून मानण्यात येते. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, डीटीए युनिटद्वारे प्रत्यक्ष वापरकर्त्याच्या अटीसह ईओयू ला आणि निर्यात उत्पादनासाठी वापरलेल्या मालाच्या पुरवठ्यास मानीव निर्यात म्हणून मानले जाते. अशा व्यवहारांना संबद्ध वेळेला लागू असलेल्या एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, काही विशिष्ट लाभ देण्यात आले आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत :-

"८.३.मानीव निर्यातीसाठी लाभ

मानीव निर्यात, निदेशपुस्तक प्रक्रिया, खंड १ (एचबीपी व्ही१ - हँडबुक ऑन प्रोसिजर्स व्ही १) मध्ये घालून दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मानीव निर्यात म्हणून अहर्ता प्राप्त करणाऱ्या मालाची निर्मिती आणि पुरवठ्याच्या बाबतीत खालील लाभांपैकी कोणत्याही एका लाभासाठी / सर्व लाभांसाठी पात्र असेलः-

(ए) अग्रीम प्राधिकारपत्र / वार्षिक आवश्यकतेसाठी अग्रीम प्राधिकारपत्र / डीएफआयए.

(बी) मानीव निर्यातीच्या उणिवा

(सी) जेथे पुरवठा हा आयसीबी नुसार (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) केला जातो, तेथे टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) तून सूट. **इतर प्रकरणांमध्ये, टीईडी चा परतावा दिला जाईल.** अग्रीम प्राधिकारपत्र धारकाने दुसरे अग्रीम प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या निर्माणकास केलेल्या पुरवठ्यासाठी सुद्धा टीईडी उपलब्ध असेल, जर अशा निर्माणकाने आळीपाळीने अंतिम निर्यातकास पुरवठा केला असेल तर."

आणि, पूर्वठाकरांना लाभाची तरतूद करणाऱ्या, संबंधित वेळेला लागू असल्याप्रमाणे, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) चा मूळ परिच्छेद ८.४ खालीलप्रमाणे:

"८.४. पुरवठाकारास उपलब्ध असलेले लाभ

८.४.१. (i) एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.२ (ए) च्या अनुसार अग्रीम प्राधिकारपत्र /डीएफआयए नुसार केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार दरम्यानच्या पुरवठ्याकरिता अग्रीम प्राधिकारपत्रासाठी / डीएफआयए साठी हक्कदारअसेल.

(ii) जेथे पुरवठा अग्रीम परिमोचन आदेश (एआरओ- एडव्हान्स रिलीस ऑर्डर) नुसार किंवा एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ४.१.११ आणि ४.१.१२ च्या अनुसार किंवा अग्रीम प्राधिकारपत्र /डीएफआयए नुसार निर्गमित केलेल्या एका

पाठोपाठ एक पतपत्रानुसार केला असेल तर, पूरवठाकार एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेल्या, जे लागू असतील त्या, लाभांसाठी हक्कदार असेल.

८.४.२. **एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.२ (बी) च्या अनुसार ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)/एसटीपी (सॉफ्टवेअर टेकनॉलॉजी पार्क)/ईएचटीपी (इलेकट्रोनिक्स हार्डवेअर टेकनॉलॉजी पार्क) /बीटीपी (बायॉ- टेकनॉलॉजी पार्क) ला केलेल्या मालाच्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार फटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेल्या, जे लागू असतील त्या, लाभांसाठी हक्कदार असेल.**

८.४.३. फटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.२(सी) अंतर्गत केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार फटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेल्या, जे लागू असतील त्या, लाभांसाठी हक्कदार असेल.

८.४.४. (i) फटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.२(डी), (एफ) आणि (जी) अंतर्गत केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार फटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेल्या, जे लागू असतील त्या, लाभांसाठी हक्कदार असेल.

(ii) परिच्छेद ८.२ (डी) मध्ये नमूद केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, आर्थिक कार्य विभाग, वित्त मंत्रालय (डीईए, एमओएफ - डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक अफेअर्स, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स) द्वारे अधिसूचित केले जाईल अशाच केवळ एजन्सीच्या निधी दिलेल्या प्रकल्पांना केलेला पुरवठा हा मानीव

निर्यात लाभांकरिता पात्र असेल. अशा एजन्सीची /निधीची यादी निदेशपुस्तक प्रक्रिया, खंड १ (एचबीपी व्ही१ - हॅंडबुक ऑन प्रोसिजर्स व्ही १) च्या परिशिष्ट १३ मध्ये दिली आहे.

(iii) एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.२ (एफ) अंतर्गत मानीव निर्यातीचे लाभ, अशा वस्तूंच्या बाबतीत लागू असतील, ज्यांची आयात करण्यास, अधिसूचना क्र. २१/२००२-सीमाशुल्क, दिनांक १.३.२००२, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे, नुसार, विनिर्दिष्ट केलेल्या शर्थींच्या पूर्ततेच्या अधीन राहून शून्य सीमा शुल्काने डीओआर ने अनुज्ञा दिली आहे.

(iv) परिच्छेद ८.२ (जी) च्या अनुसार ऊर्जा प्रकल्पांना भांडवली वस्तूंच्या एफओआर मूल्याच्या १०% पर्यंत सुटे भाग यांचा केलेला पुरवठा मानीव निर्यातीचे लाभ आणि भांडवली वस्तूंचा पुरवठा जर स्वतंत्र ऊर्जा उत्पादक (आयपीपी- इंडिपेंडंट पॉवर प्रोड्युसर)/अभियांत्रिकी आणि प्रापण करार (ईपीसी-इंजिनीरिंग अँड प्रोक्युरमेन्ट कॉन्ट्रॅक्ट) टप्प्यावर आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली (आयसीबी - इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) कार्यपद्धतींचे पालन करण्यात आले तर मानीव निर्यात लाभाकरीता पात्र असेल. मानीव निर्यातीचे लाभ वीज संयंत्राच्या नूतनीकरणासाठी/आधुनिकीकरणासाठी देखील उपलब्ध होईल. एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये यादी केलेल्या जे लागू असेल, त्या लाभांसाठी पूरवठाकार पात्र असेल. मात्र, डीओआर अधिसूचना क्र. २१/२००२ -सीमाशुल्क दिनांक १.३.२००२ सुधारित केल्याप्रमाणे च्या अनुक्रमांक ४०० मध्ये, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणताही प्रचंड ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या मालाचा पुरवठा, जर अशा प्रचंड ऊर्जा प्रकल्पाने

सीमाशुल्क अधिसूचने मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रारंभिक निर्मिती क्षमतेचे पालन करीत असेल तर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी)च्या परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, जे लागू असेल त्या मानीव निर्यात लाभांसाठी पात्र असेल.

[२०१०-२०११ मध्ये सुधारणानंतर परिच्छेद ८.४.४(iv), खालीलप्रमाणे आहेः-

"(iv) परिच्छेद ८.२ (जी) च्या अनुसार ऊर्जा प्रकल्पांना भांडवली वस्तूंच्या एफओआर मूल्याच्या १०% पर्यंत सुटे भाग यांचा केलेला पुरवठा मानीव निर्यातीचे लाभ आणि भांडवली वस्तूंचा पुरवठा जर स्वतंत्र ऊर्जा उत्पादक (आयपीपी- इंडिपेंडंट पॉवर प्रोड्युसर)/अभियांत्रिकी आणि प्रापण करार (ईपीसी- इंजिनीरिंग अँड प्रोक्युरमेन्ट कॉन्ट्रॅक्ट) टप्प्यावर आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली (आयसीबी - इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) कार्यपद्धतींचे पालन करण्यात आले तर मानीव निर्यात लाभाकरीता पात्र असेल. **तथापि, प्रचंड ऊर्जा प्रकल्पांच्या संबंधी, आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली ची (आयसीबी - इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) आवश्यकता, जर विजेचे आवश्यक प्रमाण प्रशुल्क आधारित स्पर्धात्मक बोलीद्वारे बांधून ठेवली असेल तर किंवा जर प्रकल्प प्रशुल्क आधारित स्पर्धात्मक बोलीद्वारे देण्यात आला असेल तर, अनिवार्य राहणार नाही.** एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये यादी केलेल्या जे लागू असेल, त्या लाभांसाठी पूरवठाकार पात्र असेल. मात्र, डीओआर अधिसूचना क्र. २१/२००२ -सीमाशुल्क दिनां १.३.२००२ सुधारित केल्याप्रमाणे च्या अनुक्रमांक ४०० मध्ये, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणताही प्रचंड ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या मालाचा पुरवठा, जर अशा प्रचंड ऊर्जा प्रकल्पाने सीमाशुल्क

अधिसूचने मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रारंभिक निर्मिती क्षमतेचे पालन करीत असेल तर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी)च्या परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, जे लागू असेल त्या मानीव निर्यात लाभांसाठी पात्र असेल. **पुढे, डीओआर अधिसूचना क्र. २१/२००२ -सीमाशुल्क दि. १.३.२००२ चे एसएल क्र. ४००ए मध्ये, सुधारित केल्याप्रमाणे, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या प्रचंड ऊर्जा प्रकल्पांच्या विस्तारासाठी आवश्यक असलेल्या मालाचा पुरवठा हा, एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मानीव निर्यातीचे लाभांसाठी पात्र असेल.**"]

(सुधारणा ठळक करण्यात आल्या आहेत)

(v) नवव्या योजनेच्या कालावधीत उभारण्यात येणाऱ्या नवीन तेल परिष्करणी आणि दहाव्या योजनेच्या कालावधीपर्यंत त्यांचे उभारणे चालू देणाऱ्या नवीन तेल परिष्करणी यांना एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.२(जी) करण्यात येणारा पुरवठा, अधिसूचना क्र. २१/२००२-सीमाशुल्क दिनांक १.३.२००२, च्या अनुक्रमांक २२८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी १७ मध्ये वेळोवेळी सुधारित केलेल्याप्रमाणे, नमूद केलेल्या मालाच्या बाबतीत, मानीव निर्यात लाभासाठी पात्र असेल. पुरवठाकार एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये, यादी केलेले लाभ, च्यापैकी जे लागू असेल त्या लाभांसाठी पात्र असेल.

८.४.५. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.२(ई) खाली केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३(ए) आणि (बी) मध्ये, यादी केलेले लाभ, च्यापैकी जे लागू असेल त्या लाभांसाठी पात्र असतील. नवव्या योजनेच्या कालावधीत जी खत संयंत्रे उभारली आहेत त्यांचा विस्तार केला आहे/ सुधारली आहेत / पुनर्संचयित केली आहेत /आधुनिकीकरण केले आहे अशा खत

संयंत्रांना भांडवली माल व सुटे भागांच्या केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत मानीव निर्यातीचा लाभ उपलब्ध असेल. ८व्या/९व्या योजनेच्या कालावधीत जी खत संयंत्रे सुरू झालेली आहेत आणि त्यांना १०व्या योजनेच्या कालावधीपर्यंत वाढू दिले आहेत अशा खत संयंत्रांना केलेल्या पुरवठ्यावर सुद्धा मानीव निर्यातीचा लाभ उपलब्ध होईल.

८.४.६ एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.२(आय) खाली समाविष्ट असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांद्वारे निधी पुरविलेल्या प्रकल्पांना करण्यात आलेल्या मालाचा पुरवठा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए) आणि (बी) मध्ये, यादी केलेले लाभ, च्यापैकी जे लागू असेल त्या लाभांसाठी पात्र असेल.

८.४.७. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.२ (जे) खाली अणुऊर्जा प्रकल्पांना केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये दिलेले लाभांपैकी जे लागू असेल त्या लाभांसाठी पात्र असेल. अणुऊर्जा विभागातील, भारत सरकारचे सहसचिव यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे ४४० मेगा वॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमता असलेले, अधिसूचना क्र. २१/२००२-सीमाशुल्क, दि. १.३.२००२ च्या अनुक्रमांक ४०१ येथील यादी ४३, वेळोवेळी सुधारीत केल्याप्रमाणे, मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अणुऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या अशाच केवळ मालाचा केलेला पुरवठा, अशा प्रकरणात जेथे स्पर्धात्मक बोली च्या (आणि आयसीबी-इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग नाही) कार्यपद्धतीचे पालन करण्यात आले आहे तेथे मानीव निर्यात लाभांसाठी पात्र असेल.

(भर देण्यात आला)

जरी हे लाभ म्हणून अभिव्यक्त केले असले, तरी हे मूलतः परिच्छेद ८.४.२ च्या अनुसार डीटीए पूरवठकारानी फायदा करून घ्यावयाचे अनुज्ञेयता

आहेत. आधी नमूद केल्याप्रमाणे, परिच्छेद ६.११ (ए) च्या संदर्भात, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या ८ व्या प्रकरणात निर्दिष्ट केल्यानुसार डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) च्या त्या हक्कांचा लाभ घेऊ शकते, जे डीटीए पुरवठाकारासाठी राखून ठेवण्यात आले होते. याचा अर्थ असा नाही की ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) स्वतःच्या इच्छेनुसार त्या हक्कांसाठी पात्र आहे, कारण इतर गोष्टींबरोबरच, डीटीए पुरवठाकाराकडून अस्वीकरण प्राप्त करणे हि पूर्वअट बंधनकारक आहे.

२१. वर नमूद केल्याप्रमाणे, परिच्छेद ८.२ मध्ये मानीव निर्यात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला केलेल्या मालाच्या पुरवठ्यासह, म्हणून मानण्यात येणाऱ्या मालाच्या पुरवठ्याच्या प्रवर्गांची यादी, दिली आहे [परिच्छेद ८.२ (बी)]. एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) खाली प्रसिद्ध केलेले निदेशपुस्तक प्रक्रिया, खंड १ मधील अटी व शर्ती च्या अधीन राहून विनिर्दिष्ट व्यवहारांना परिच्छेद ८.३ मध्ये नमूद केलेले काही विशिष्ट लाभ देण्यात आले आहेत. परिच्छेद ८.३ (सी) मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, असे अभिप्रेत आहे कि, आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोली (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) [३१] नुसार केलेल्या पुरवठ्यासाठी तसेच अग्रीम प्राधिकारपत्र धारकाला ते आणखी एक अग्रीम प्राधिकारपत्र धारण केलेला निर्माणक यांना केलेल्या पुरवठ्यासाठी सुद्धा, जर अशा नामांकने उत्पादित मालाचा पुरवठा अंतिम निर्यातकास केला असेल तर, यांना केलेल्या पुरवठ्यासाठी सुद्धा टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) तून सूट उपलब्ध आहे. मात्र, इतर प्रकरणात, (ज्यात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करणारे इतर डीटीए पुरवठकारांचा समावेश असेल), तथापि टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) चा परतावा देण्यात येईल. आणखी असे कि, "विल" ("will") या शब्दप्रयोगाचा अशा डीटीए पुरवठाकारांना त्यांची एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) खाली अनुज्ञेयता म्हणून परतावा देण्याचा महाआदेश म्हणून अर्थ लावायचा आहे. हे डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) कडून केलेल्या पुरवठ्याच्या बाबतीत, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला सुरुवाती पासून देण्यात आलेल्या शुल्क भरण्याच्या सवलती कमी होत नाहीत.

२२. हे लक्षात भरणारे आहे कि, एफटीपी (फॉरैन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद

८.३ (सी) नुसार उप-परिच्छेद (ए) आणि (बी) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे आयसीबी (इंटरनॅशनल कॉम्पेटिटिव्ह बिडिंग) आणि आगाऊ अधिकृतता धारकासाठी अंतर्निर्मित पात्रता "श्रेणी" प्रदान करत नाही. उप-परिच्छेद (सी) मधील "इतर प्रकरणांमध्ये" हा शब्दप्रयोग योग्य दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. हे अनुमान्य आहे कि परिच्छेद ८.४.१ ते ८.४.७ नुसार ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या मानीव निर्यात मानल्या जाणाऱ्या पुरवठाकारला लाभ देण्याबाबात उपबंधीत आहे. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केल्याप्रमाणे, तो मूलतः डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराचा हक्क आहे, जो लागू होऊ शकतो. असे दिसून येते की परिच्छेद ८.४.२ च्या जागी २०१२ च्या सुधारित एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) प्रस्थापीत करण्यात आली, जेथे एक तक्ता समाविष्ट करण्यात आला[३२]. सदर तक्त्यानुसार, परिच्छेद ८.२ नुसार पुरवठयाच्या विशिष्ठ प्रवर्गासाठी परिच्छेद ८.२ (बी) मध्ये ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठ्यासह समाविष्ट पुरवठ्यासाठी उपलब्ध लागू लाभ असलेले परिच्छेद ८.३ अंतर्गत विस्तारित करण्यात आले होते.

२३. एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (सी) च्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी)/ शुल्क प्रतिग्रहाच्या (ड्रॉबॅकच्या) परताव्याची पात्रता मूळ परिच्छेद ८.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राप्तकर्त्याद्वारे अशा वस्तूंवर सेनव्हॅट (CENVAT) क्रेडिट/सूट (वटाव) न मिळाल्यावर अवलंबून आहे. ते खालीलप्रमाणे आहे :

> **"८.५ टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी)/ शुल्कप्रतिग्रह च्या (ड्रॉबॅक) परताव्याकरिता पात्रता**
>
> मालाचा पुरवठा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) च्या अनुसार टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) च्या परताव्याकरीता जर माल प्राप्तकर्त्याने अशा वस्तूंवरील सेनव्हॅट क्रेडिट चा/वटाव चा फायदा घेतला नसेल तर पात्र असेल. त्याचप्रमाणे, पुरवठा इनपुटस /कॉम्पोनन्ट्सवर चुकता करण्यात आलेल्या केंद्रीय उत्पादन शुल्कावरील एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (बी) च्या अनुसार, मानीव निर्यात शुल्कप्रतिग्रह साठी

जर अर्जदाराने सेनव्हॅट क्रेडिट फॅसिलिटी /वटाव चा लाभ घेतला नसेल, तर पात्र ठरेल. तथापि, अशा पुरवठा, इनपुटस /कॉम्पोनन्ट्सवर चुकते केलेल्या सीमाशुल्कावरील मानीव निर्यात शुल्कपरिग्रहाकरिता पात्र असेल.

[२०१२-२०१३ मध्ये, सुधारणा नंतर, परिच्छेद ८.५, खालीलप्रमाणे आहे :-

"८.५ टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी)/ शुल्कप्रतिग्रह च्या (ड्रॉबॅक) परताव्याकरिता पात्रता

मालाचा पुरवठा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) च्या अनुसार टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) च्या परताव्याकरीता जर माल प्राप्तकर्त्याने अशा वस्तूंवरील सेनव्हॅट क्रेडिट चा/वटाव चा फायदा घेतला नसेल तर पात्र असेल. **तशा अर्थाचे प्रतिज्ञापन मालाच्या प्राप्तकर्त्याकडून एएनएफ ८ च्या जोडपत्र II मध्ये, अर्जदारद्वारा सादर करण्यात येईल.** त्याचप्रमाणे, पुरवठा इनपुटस /कॉम्पोनन्ट्सवर चुकता करण्यात आलेल्या केंद्रीय उत्पादन शुल्कावरील एफटीपी च्या (फॉरेन ट्रेड पॉलिसी) परिच्छेद ८.३ (बी) च्या अनुसार, मानीव निर्यात शुल्कप्रतिग्रह साठी जर **मालाच्या पुरवठाकाराने अशा भरलेल्या शुल्कासाठी सेनव्हॅट क्रेडिट/वटाव** चा लाभ घेतला नसेल, तर पात्र ठरेल. **तशा अर्थाचे प्रतिज्ञापन मालाच्या पुरवठाकाराकडून एएनएफ ८ च्या जोडपत्र II मध्ये, अर्जदारद्वारा सादर करण्यात येईल.** तथापि, अशा पुरवठा, इनपुटस /कॉम्पोनन्ट्सवर चुकते केलेल्या सीमाशुल्कावरील मानीव निर्यात शुल्कपरिग्रहाकरिता पात्र **ठरेल.**]

(सुधारणा ठळक करण्यात आल्या आहेत)

८.५.१. परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत प्रकरण निकाली न काढल्यास (हँडबुक ऑन प्रोसिजर्स व्ही १ च्या परिच्छेद ९.१०.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) मानीव निर्यात योजने अंतर्गत शुल्क करप्रतिग्रह आणि टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) परत करण्यास विलंब झाल्यास दर साल दर शेकडा ६ टक्के या दराने सरळ व्याज देय असेल.

२४. त्याचप्रमाणे, डीटीए पुरवठाकाराने सेनव्हॅट क्रेडिट/ सूट (वटाव) चा लाभ

घेतला नसल्यास इतर औपचारिकता पाळण्याच्या अधीन राहून एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (बी) अंतर्गत मानीव निर्याती संबंधित लाभ घेता येईल. परिच्छेद ८.४.२ हे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (ए) (बी) आणि (सी) मध्ये निर्दिष्ट केल्यानुसार, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाच्या पुरवठ्याच्या संदर्भात केवळ (डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया)) पुरवठाकार देण्यात आलेल्या पर्यायाचे सूचक आहे जे २०१२ च्या सुधारणेनंतरही मार्च २०१३ पर्यंत कायम आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की परिच्छेद ८.५ चा तात्पर्यार्थ असा आहे की जर मालावर सेनव्हॅट क्रेडिट/सूट (वटाव) मिळाले नसेल तरच त्या मालाच्या पुरवठ्यावर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा मिळण्यास पात्र असेल. या अटी असे दर्शवतात की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची योजना स्पष्ट आहे आणि संबंधित संस्थांचे लाभ आणि हक्कांच्या संदर्भात संदिग्ध नाही किंवा मूक हि नाही. म्हणून, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या हेतूला पराभूत करण्याची क्षमता लागू असलेल्या युक्तिवादाचा कोणत्याही प्रकारे स्वीकार करण्यात येऊ नये .

२५. संबद्ध कालावधीत लागू असलेली एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची योजना लक्षात घेता, याप्रमाणे हे अगदी स्पष्ट आहे की, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला भारतात निर्माण केलेल्या मालावर डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) कडून भरणा केलेल्या मालावर केंद्रीय उत्पादन शुल्कातून आरंभपासूनच सूट मिळण्यास हक्कदार होती, कारण अशा मालाची आयात शुल्क न भरता करावयाची होती. जास्तही नाही आणि कमीही नाही. त्याने, तथापि ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)ला परिच्छेद ६.११ (ए) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे, डीटीए पुरवठाकाराकडून यथोचित अस्वीकरण प्राप्त केल्यावर प्रकरण ८ खाली डीटीए पुरवठाकाराच्या अनुज्ञेयतेचा फायदा घेण्यापासून अवरोधित केले नाही. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे त्याचा फायदा घेणे प्रकरण ८ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे डीटीए पुरवठाकाराच्या अनुज्ञेयतेशी जोडण्यात आले होते. डीटीए पुरवठाकार त्याने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)ला पुरवठा केलेल्या मालाच्या बाबतीत परिच्छेद ८.३ (सी) विचारात घेता, टीईडी पासून सूट दिलेली असल्यामुळे टीईडी परत घेऊ शकतो (परत घेण्यास हक्कदार असेल). तथापि, टीईडी च्या परतावा करीता पात्रता, पालन करावयाच्या औपचारिकतेने व आवश्यकतेने,

परिच्छेद ८.५ मध्ये नोंद केल्याप्रमाणे, सह, परिसीमित केलेली आहे. त्यामध्ये, मालाचा प्राप्तकर्ता (ईओयू) सेनव्हॅट क्रेडिट चा किंवा वटावा चा फायदा करून घेत नाही. त्याचप्रमाणे, डीटीए पुरवठाकार इनपुटस /कॉम्पोनन्ट्सवर चुकते केलेल्या केंद्रीय उत्पादन शुल्कावरील एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (बी)च्या अनुसार, मानीव निर्यात शुल्कप्रतिग्रह साठी (ड्रॉबॅक) जर सेनव्हॅट क्रेडिट फॅसिलिटी /वटाव चा फायदा करून घेण्यात आलेला नसेल तर, पात्र ठरेल.

२६. संबंधित परिच्छेद आणि त्याच्या खंडाचे संयुक्त वाचन केल्यावर, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ मधील औपचारिकता आणि अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून परिच्छेद ८.३ (सी) च्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा देऊन डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांना प्रोत्साहित करणे हा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) विषयाचा हेतू होता यात कोणतीही शंका नाही. सदर हेतू हा परकीय चलन निर्माण करण्यासाठी देखील होते कारण निविष्ट माल म्हणून किंवा अन्यथा पुरवल्या गेलेल्या मालाची शेवटी ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) द्वारे निर्यात केली जात असे. दुसरीकडे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने सूट (वटाव) किंवा सेनव्हॅट क्रेडिट सुविधा (परिच्छेद ८.५ नुसार) घेतली नसेल तरच ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कांचा लाभ घेऊ शकेल. दिनांक १५/०३/२०१३ या तारखेचे धोरणा परिपत्रक जारी होईपर्यंत या योजनेचे एकसमान पालन केले गेले. ते परिपत्रक खालीलप्रमाणे आहेः-

“भारत सरकार

वाणिज्य व उद्योग मंत्रालय

विदेश व्यापाराचे महासंचनालय

उद्योग भवन, नवी दिल्ली

धोरण परिपत्रक क्र. १६ (आर. ई.-२०१२/२००९-१४)

दिनांकः १५ मार्च, २०१३

प्रति,

सर्व प्रादेशिक प्राधिकरणे

सर्व विकास आयुक्त, एसईझेड.

विषयः टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) तून सूट उपलब्ध असल्यास, टीईडी परतावा संबंधी स्पष्टीकरण.

या संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की विदेशी व्यापारी महासंचनालयाचे काही प्रादेशिक प्राधिकरण आणि एसईझेड चे विकास आयुक्त यांचे अधिकारी ज्या प्रकणांत मानीव निर्यात खाली मालाच्या पुरवठ्याला सुरुवातीपासूनच सूट देण्यात आली आहे, अशा प्रकरणांत देखील टीईडी चा परतावा देत आहेत.

२. पुरवठ्याचे तीन प्रवर्ग आहेत, जेथे मानीव निर्यात खाली मालाच्या पुरवठ्याला सुरुवाती पासून उत्पादन शुल्कचा भरणा कण्यापासून सूट दिली आहे. ते खालीलप्रमाणे आहेतः

(i) अग्रीम प्राधिकारपत्राच्या नुसार निर्गमित केलेल्या विधिअग्राह्यता पत्र (इनवेलीडेशन लेटर) नुसार वस्तूंचा पुरवठा [एफटीपी चा परिच्छेद ८.३ (सी)];

(ii) आयसीबी (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) खाली वस्तूंचा पुरवठा [एफटीपी चा परिच्छेद ८.३ (सी)]; आणि

(iii) ईओयू ला (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) वस्तूंचा पुरवठा [एफटीपी चा परिच्छेद ६.११ (सी) (ii)]

३. ज्या प्रकरणांमध्ये सूट देणे अनिवार्य केले आहे त्या प्रकरणांमध्ये जर परतावा दिल्यास दूरदर्शी वित्तीय व्यवस्थापन आणि अर्थसंकल्पच्या शिस्तीचे पालन याची तडजोड होईल. वस्तुतः, अशा प्रकरणांमध्ये प्रथमतः संबंधित कर वसूल करावयास नको होते. **आणि जर एखादी चूक/नजरचुक झाली असेल, तर कर वसूल करणाऱ्या एजन्सी ने,** दुसऱ्या एजन्सीकडून त्याची प्रतिपूर्ति करण्याचा प्रयत्न करण्या ऐवजी, **त्याचा परतावा करेल**. तदनुसार, असे स्पष्ट करण्यात येते कि, वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विदेशी व्यापाराच्या महासंचालकाचे प्रादेशिक प्राधिकरणे/विकास आयुक्त यांच्या कार्यालयाद्वारे कोणताही टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) चा परतावा देण्यात येऊ नये, कारण अशा पुरवठ्यांना आरंभापासूनच उत्पादन शुल्काचा भरणा करण्यापासून सूट मिळालेली आहे.

४. विदेशी व्यापाराच्या महासंचालकाच्या मान्यतेने हे निर्गमित केले आहे.

(जय करण सिंग)

विदेश व्यापार सहसंचालक

........"

(भर देण्यात आला)

सदरचे परिपत्रक हे या गृहीतकावर पुढे जाते कि, डीटीए (डोमेस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरविलेला माल मानीव निर्यातीची बाब असल्याने, त्याने परिणाम म्हणून उत्पादन शुल्क भरण्यापासून सुरवातीपासूनच सूट मिळणे अटळ होईल असे केले. आतापर्यंत अर्थ लावलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या तरतुदींचे बारकाईने वाचन करता, आम्हाला हे मानणे जरुरी आहे कि, डीटीए पुरवठाकाराला उत्पादन शुल्क भरण्यापासून देण्यात आलेली सूट, ही काही विशिष्ट औपचारिकता आणि अटींचे पालन करण्याच्या अधीन होती. डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) युनिटने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवलेला माल हा मानीव निर्यातीची बाब असल्याने, त्यास सुरुवातीपासूनच उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट देण्यात येते, या गृहीतकावर सदर परिपत्रकाला चालना मिळते. हे सत्य आहे की, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) विषयात असे नमूद केले आहे की विशिष्ट माल ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) किंवा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) मधील बंधपत्रित वाखरांमधून किंवा भारतात आयोजित आंतरराष्ट्रीय प्रदर्शनातून शुल्क न भरता आयात करू शकते. परंतु अशा प्रकारे आयात केलेला माल प्रत्यक्ष वापरकर्त्याच्या नुसार अटीबद्ध असेल आणि त्याचा वापर निर्यात उत्पादनासाठी केला जाईल आणि पुढे, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने परिच्छेद ८.५ मध्ये प्रदान केल्याप्रमाणे सूट (वटाव) घेतला नसेल किंवा सेनव्हॅट क्रेडिट सुविधेचा लाभ घेतला नसेल तरच टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) ची सूट मिळू शकते. या आकलनावरून, नमूद केलेले धोरण परिपत्रक जारी होईपर्यंत, डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने यापूर्वी परतावा केलेल्या टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परतावा विनंत्यांची दखल विभागाद्वारे घेण्यात येत होती. त्या अर्थाने, किमान डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांसाठी ही आरंभपासूनची सूट नव्हती. त्यामुळे हे परिपत्रक डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांसाठी एक नवीन परिमाण सादर करते. डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया)

पुरवठादारांसाठी असा बदल विदेशी व्यापार संयुक्त संचालकांच्या स्वाक्षऱ्यांखाली धोरण परिपत्रक जारी करून केला जाऊ शकत नाही. कारण, केंद्र सरकारने एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद १.२ सह १९९२ च्या कायद्याच्या कलम ५ [३३] अंतर्गत (संबंधित वेळी लागू असलेल्या) प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) तयार केली आहे, जी दिनांक २७/०९/२००९ रोजी पासून लागू झाली होती. प्रचलित योजनेत/व्यवस्थेत बदल करण्यापासून विभागास /केंद्र सरकार ला प्रतिष्टम्भीत केले आहे असे म्हणण्याचा आमचा हेतू नाही. परंतु, आम्हाला हे स्पष्ट आहे की (मार्च, २०१३ पूर्वी दिनांक १८/०४/२०१३ रोजी केंद्र सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेसह प्राप्त झालेली योजना, अस्तित्वात असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३(सी) आणि ८.४ च्या संबंधित तरतुदींमध्ये सुधारणा केल्या असता डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारांच्या तुलनेत त्या भौतिकदृष्ट्या भिन्न होत्या. कारण, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या बाबतीत परिच्छेद ६.११ (सी) (ii) सह परिच्छेद ६.२ (बी) च्या आधारावर दिल्याप्रमाणे, त्यांच्यासाठी ही आरंभापासूनची सूट नव्हती. त्यानुसार, परिच्छेद ८.३ (सी) आणि ८.४ मध्ये दुरुस्ती करून दिनांक १८.४/.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे हे उघडपणे स्पष्ट करणे आवश्यक झाले आहे, की यापुढे डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारासाठी देखील ही आरंभापासूनची सूट मानली जाईल. खरे तर हा एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) मध्ये केलेला बदल किंवा दुरुस्ती आहे. अशा बदलाला केवळ संभाव्य परिणाम देण्याची गरज आहे, जो प्रत्यायोजित कायद्याद्वारे सादर केला जातो. आम्हाला दि. १८.४.२०१३[३४] च्या अधिसूचनेच्या न्याय्यतेवर आणि वैधतेवर विचार करण्याची आवश्यकता नाही किंवा बोलावले जात नाही. लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खाली डीटीए पुरवठाकारांचा निहित हक्क नाकारण्यासाठी धोरणाविषयक परिपत्रक आधार असू शकत नाही असा विचार व्यक्त करणे पुरेसे आहे.

२७. त्यामुळे, इओयू द्वारे टीइडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्यासाठीच्या दाव्याच्या संबंधात, परिच्छेद ६.११(ए) मध्ये उपबंधित केलेली सूट, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) प्रकरण ८ खाली डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या हक्कासह याद्वारे त्याचे नियमन करणे आवश्यक आहे, तथापि त्यावर

डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) प्राधिकारणानी नियम २००४ चे नियम ५ खाली देण्यात आलेल्या सेनव्हॅट क्रेडिट च्या परताव्याच्या मुळाशी असलेली तत्वे लक्षात ठेऊन आणि त्याकरिता उपबंधित केलेल्या रीतीने, जरी नियम ५ ने समावेश केलेले नसले तरी, कारवाई करावयास हवी. त्याचे कारण की कायद्यामध्ये ते लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या आधारे मानीव निर्यातीचे प्रकरण आहे.

२८. तथापि, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला स्वतःहून टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याचा हक्क नाही, कारण परिच्छेद ६.२ (ब) सह परिच्छेद ६.११ (सी) (ii) च्या संदर्भात दिलेली प्रारंभिक सूट लक्षात घेता, शुल्क न भरता डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराकडून वस्तू खरेदी करणे किंवा आयात करणे हा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) चा आदेश आहे. तसेच, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) वर असे जाहीर बंधन असूनही, जर ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) भरून डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराकडून वस्तू आयात केल्या असतील, तर ते केवळ परिच्छेद ८.४.२ सह परिच्छेद ८.३ (सी) आणि ८.५ अंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराला प्रदान केलेल्या परताव्याच्या लाभासाठी त्यासंदर्भात अस्वीकरण मिळविण्याच्या आणि इतर औपचारिकता आणि आवश्यकतांचे पालन करण्याच्या अधीन राहून दावा करू शकतात.

२९. आम्ही त्यामुळे मुंबई उच्च न्यायालय ज्या निष्कर्षाप्रत पोहोचले त्या घेतलेल्या निष्कर्षाशी सहमत आहोत की ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला स्वतःहून टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) च्या परताव्याचा दावा करण्यासाठी हक्कदार नाही. अशा प्रकारे, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला स्वतःहून टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याचा दावा करण्याचा अधिकार नाही. तथापि, न्यायालयाने एक सावधान पत्र जोडले आहे की एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या प्रकरण ८ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे नंतर तो लाभ डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकारला ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) परत देणार नाही या अटीवर (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठादाराच्या हक्कांचा लाभ घेऊ शकते. कोणत्याही परिस्थितीत, परताव्याच्या दाव्यावर सेनव्हॅट क्रेडिटचा परतावा/उत्पादन शुल्क दायित्वावरील वरील सूट (वटाव) ही अंतर्निहित कार्यपद्धती लक्षात घेऊन प्रक्रिया

करणे आवश्यक आहे. जर डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकार किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने वापरलेले सेनव्हॅट क्रेडिट, वटवले जाऊ शकत नसेल, तर रोख रक्कम परत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा परिस्थितीत, रोख रक्कम देण्याऐवजी संबंधित संस्थेच्या सेनव्हॅट क्रेडिट खात्यात सममान रक्कम परत केली जाणे आवश्यक आहे.

३०. जर, एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) योजनेअंतर्गत डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराकडून परताव्याचा दावा मान्य करण्यात आला असेल आणि जर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) रोख स्वरूपात भरलेली असेल तर तो रोख स्वरूपात असू शकतो. अन्यथा, हे डीटीए (डोमॅस्टिक ट्रॅफीक एरिया) पुरवठाकाराच्या संबंधित खात्यात सममान सेनव्हॅट क्रेडिट रकमेचे प्रत्यावर्तन करण्याच्या स्वरूपात असू शकते.

३१. डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराच्या परताव्यासाठीच्या दाव्याचा संबंधात त्यावर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खालील प्राधिकाऱ्यांनी एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) प्रकरण ८ मध्ये तपशिलात दिलेल्या अटी जसे की आयात केलेला माल किंवा ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरविलेला माल प्रत्यक्ष वापरकर्त्यांच्या अटी नुसार असेल आणि निर्यात उत्पादनासाठी वापरला जाईल आणि ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने त्याला पुरविलेल्या मालाच्या संदर्भात सेनव्हॅट क्रेडिट किंवा सूट (वटाव) घेतला नसेल याचा आशय लक्षात ठेऊन कारवाई करणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे जर डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पुरवठाकाराने सेनव्हॅट क्रेडिट चा वापर केला असेल, तर सममान रक्कम त्याच्या सेनव्हॅट क्रेडिट खात्यात प्रत्यावर्तीत करणे आवश्यक आहे. तसे केल्यास डीटीए (डोमॅस्टिक टॅर्रीफ एरिया) पूर्ववठाकार रक्कम रोखीने परत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

३२. आता आपण एफटीपी या विषयाशी संबंधित न्यायालयीन निर्णयांकडे परत जाऊ. आमच्याकडे शिफारस केलेला मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय ज्यास, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट)ने प्रथम दोन अपिलांमध्ये आव्हान दिले आहे त्या निर्णयाच्या खेरीज, इतर सर्व प्रसिद्ध केलेले निर्णय विनिर्दिष्ट वस्तू/सेवांच्या डीटीए पुरवठाकाराच्या संदर्भात आहेत.

३३. सर्वात आधीचा निर्णय **आयएफजीएल रिफ्रॅक्टरीज लिमिटेड**[३५] या

प्रकरणातील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांचा हा आहे. उच्च न्यायालयाने हे लक्षात घेतले कि संबंधित वर्षांसाठी निर्यात आणि आयात धोरण हे इतर गोष्टींबरोबर विदेशी चलन मिळवणे आणि जागतिक बाजारपेठ वाढवणे हा उद्देश ठेवून विदेशात भारतीय उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी, स्वीकारण्यात आले होते. प्रस्तुत योजना हि देशीय पुरवठाकरांना उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट किंवा उत्पादन शुल्कचा परतावा, जर अगोदरच चुकते केले असेल तर, या दोहोपैकी एका मार्गाने काही विशिष्ट लाभ व अनुज्ञेयता देऊन प्रोत्साहन देण्यासाठी मांडली होती. या योजनेचा उद्देश निर्यातकारांना निर्यात साहित्याच्या उत्पादनासाठी शुल्क-मुक्त इनपुट देणे होता आणि त्या कारणास्तव, योजनेने पुरवठाकारास कोणतेही उत्पादन शुल्क भरण्यापासून सूट दिली आणि जर उत्पादन शुल्क भरले असल्यास, टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) च्या परताव्याची तरतूद करण्याचा होता. उच्च न्यायालयाने आणखी लक्षात घेतले कि १९४४ च्या अधिनियमा खाली आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार डीटीए पुरवठाकाराला असा परतावा अनुज्ञेय नव्हता, केवळ या कारणास्तव, ते डीटीए पुरवठाकारास एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) नुसार अनुज्ञेयता व लाभ यांचा फायदा करून घेण्यास वंचित करणार नाही. त्यांनी असा निर्णय दिला कि, निर्धारीतीस कोणत्याही कायद्याचा, विशेषतः जो अधिक फायदाचा आहे त्या कायद्याचा लाभ घेण्याची मोकळीक आहे. तदनुसार, विद्वान एकल न्यायाधीशांनी परतावायोग्य रक्कम १२ टक्के या दराने व्याजासह भरण्याचे निर्देश दिले. सदर निर्णयाच्या विरोधात विभागाद्वारे दाखल करण्यात आलेले या अपील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या द्विसदस्सीय खंडपीठाने **जॉईंट डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड**[३६] फेटाळले. तथापि, द्विसदस्सीय खंडपीठाने, डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ला एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) नुसार संबंधित प्राधिकारी होते म्हणून निर्धारिती साठी, तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या औपचारिकता पूर्ण करेल याच्या अधीन राहून टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) ची रक्कम परत करण्याचे निर्देश दिले. दि. ७.१०.२००२ रोजी विशेष अनुमती याचिका एस. एल. पी. (दि) क्र. ५३६८/२००२, खारीज झाल्याचा परिणाम म्हणून हा निर्णय नंतर या न्यायालयाने कायम केला.

३४. पुढील निर्णय **कमिशनर ऑफ सेन्ट्रल एकसाईज अँड कस्टम्स -विरुद्ध-**

एनबीएम इंडस्ट्रीज[३७] या प्रकरणातील गुजरात उच्च न्यायालयाचा आहे. उच्च न्यायालयाच्या द्विसदस्सीय खंडपीठाने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करणारा डीटीए पुरवठाकार हा सेनव्हॅट क्रेडिटच्या परताव्याच्या संबंधित नियम २००४ चा नियम ५ असून देखील सेनव्हॅट क्रेडिटच्या परतावा करीता पात्र आहे का, या सेनव्हॅट क्रेडिटच्या परताव्याशी संबंधित प्रश्नावर विचार केला. अधिकाऱ्यांनी असा निर्णय दिला होता कि, भारताबाहेर माल निर्यात केल्याचे प्रकरण नसल्यामुळे, निर्धारिती हि ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठा केलेल्या विषय वस्तू असलेल्या मालाच्या बाबतीत उपयोजित केलेली सेनव्हॅट क्रेडिट रकमेच्या परताव्यासाठी हक्कदार नव्हती. उच्च न्यायालयाने **कमिशनर ऑफ सेन्ट्रल एकसाईज -विरुद्ध- शिल्पा कॉपर वायर इंडस्ट्रीज**[३८] या प्रकरणातील त्यांच्या पूर्वीच्या निर्णयावर विसंबून विभागाच्या त्या भूमिकेला अनुमती देण्यास नकल दिला. त्याऐवजी, उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की परताव्यासाठी मागणी हि लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ला अनुलक्षून होती आणि १९४४ च्या अधिनियमाच्या आणि त्या खाली तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या आधारे नव्हती. डीटीए पुरवठाकाराची अनुज्ञेयता हि मागू असलेल्या एफटीपी मध्ये मानीव निर्यात म्हणून जे कायद्या मध्ये न वापरलेल्या सेनव्हॅट क्रेडिट चा परतावा अनुज्ञेय होण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्यक्ष निर्यात म्हणून मानण्यात आले आहे, असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे.

३५. त्यानंतर **कंडोई मेटल पॉवडर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड** [३९] च्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय आला. हे देखील ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला लागू असलेल्या एफटीपी ला अनुलक्षून वस्तू निर्माण मालाचा पुरवठा करणाऱ्या पुरवठाकाराचे प्रकरण होते. उच्च न्यायालयाने केवळ **जॉईंट डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड**[४०] प्रकरणातील कलकत्ता उच्च न्यायालयाच्या द्विसदस्सीय खंडपीठाने दिलेल्या निर्णयावरच भर दिला नाही तर स्वतंत्रपणे असे मत व्यक्त की डीजीएफटी (डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड) ने एफटीपी तयार केलेले असल्यामुळे निर्धारितीच्या दाव्याचे संबंधित वेळीस लागू असल्याप्रमाणे त्यातील परिच्छेद ८.२, ८.३, ८.४ आणि ८.५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुज्ञेयतेद्वारे नियमन केले गेले. तदनुसार, उच्च न्यायालयाने याचिका मंजूर केली आणि याचिकाकर्त्याचा परताव्याच्या दावा संबंधित

प्राधिकरणाकडे निर्णयार्थ सोपविला. या निर्णयाचे, केवळ दिल्ली उच्च न्यायालयाच्या समकक्ष खंडपीठांनीच नव्हे तर इतर उच्च न्यायालयांनीही सुद्धा नंतरच्या निर्णयामध्ये अनुसरण केले आहे.

३६. राजा क्राउन्स अँड कॅन्स प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया[४१] च्या प्रकरणात ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करणाऱ्या डीटीए पुरवठाकाराचा अशाच प्रकारच्या दाव्याचा परामर्श घेतला आणि वर उल्लेख केलेल्या दिल्ली उच्च न्यायालय आणि कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निर्णयांचे अनुसरण करताना, मद्रास उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की निर्धारिती टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) च्या परताव्यासाठी अर्ज दाखल करण्यासाठी हक्कदार होती. उच्च न्यायालयाने, तदनव्ये, संबंधित प्राधिकाऱ्यांना याचिकाकर्त्याचा परतावा मिळण्यासाठीच्या अर्जावर विचार करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर, मद्रास उच्च न्यायालयाने **लेनोवो (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड** [४२] आणि **मनाली पेट्रोकेमिकल लिमिटेड -विरुद्ध- अडिशनल डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड**[४३] या प्रकणांमध्ये तोच दृष्टिकोन घेतला.

३७. वर नमूद केल्याप्रमाणे, **कंडोई मेटल पॉवडर्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड** [४४] मधील निर्णयाचे अनुसरण दिल्ली उच्च न्यायालयाने नंतर **युनियन ऑफ इंडिया विरुद्ध अल्स्टॉम इंडिया लिमिटेड** [४५], **कमिशनर ऑफ सेन्ट्रल एकसाईज, दिल्ली II -विरुद्ध- वेलस्प्रिंग युनिव्हर्सल** [४६], **दीपक एंटरप्रायझेस -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया**[४७], **अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया** [४८], **मदरसन सुमी इलेक्ट्रिक वायर्स -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया** [४९], **मल्टीटेक्स फिल्ट्रेशन इंजिनिअर्स लिमिटेड -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया** [५०] आणि **हिंदुस्तान टिन वर्क्स लिमिटेड विरुद्ध युनियन ऑफ इंडिया** [५१], मध्ये केले आहे.

३८. कलकत्ता उच्च न्यायालयाने घेतलेल्या आणि दिल्ली उच्च न्यायालयाने अनुसरण केलेल्या दृष्टिकोनाची **एसर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमध्ये** [५२] प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयासमक्ष देखील स्तुती करण्यात आली.

३९. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाच्या पूरवठा करणाऱ्या डीटीए पुरवठाकाराच्या सांगण्यावरून या निर्णयांमध्ये घेतलेला दृष्टिकोन हा आमच्याद्वारे या

निर्णयात घेतलेल्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. त्या मर्यादेपर्यंत, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठा करणारा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ (ए) धोरणासह परिच्छेद ८. ३ (सी), ८. ४. २ आणि ८. ५ च्या आधारे सीमाशुल्काच्या परताव्यासाठी हक्कदार होईल. परताव्याची पद्धत, तथापि जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला पुरवठा केलेल्या मालाच्या संदर्भात सेनव्हॅट क्रेडिट खात्यामध्ये सममान रक्कम प्रत्यावर्तीत करण्याच्या स्वरूपात असावयास पाहिजे आणि जर त्याने रक्कम रोखीने भरणा केली असेल तर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार मानीव निर्यात योजने खाली शुल्क प्रतिग्रह आणि टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परत करण्यास विलंब झाला असलयास लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) धोरणाच्या परिच्छेद ८.५. १ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे दरसाल दरशेकड ६ टक्के सरळ व्याजदराने रोख स्वरूपातील परताव्यासाठी हक्कदार होईल.

४०. आक्षेपित न्यायनिर्णयात मुंबई उच्च न्यायालयाने विचारात घेतलेल्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या म्हणण्याकडे परत येताना, असा निर्णय देतो कि ईओयू केवळ एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ (सी) (ii) च्या अनुसार केंद्रीय उत्पादन शुल्क चा भरणा करण्यापासून आरंभापासून सूट मिळण्यास हक्कदार आहे आणि एफटीपी च्या परिच्छेद ६.२(बी) च्या अनुसार शुल्क न भरता डीटीए पुरवठाकाराकडून वस्तू आयात करण्यास बांधील आहे. परिच्छेद ६.११ मध्ये उपबंधित केलेली व्यवस्था, तथापि, ईओयू ला, जर त्याने प्राप्त केलेल्या मालाच्या बाबतीत टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) बद्दल रक्कम डीटीए पुरवठाकाराला चुकती केलेली असेल तर, देण्यात आलेल्या 'लाभा' च्या स्वरूपात आहे. तशा परिस्थितीत, ईओयू ने डीटीए पुरवठाकाराकडून यथोचित अस्वीकारण प्राप्त केल्यावर, एफटीपी च्या प्रकरण ८ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार डीटीए पुरवठाकाराची अनुज्ञेयता प्राप्त करण्यासाठीच केवळ पात्र असेल. त्यानुसार, सुरुवातीपासून सूट च्या व्यतिरिक्त ईओयू आवश्यक अत्यावश्यक गोष्टी आणि औपचारिकतांचे पालन करण्याच्या अधीन राहून एफटीपी च्या प्रकरण ८ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे डीटीए पुरवठाकाराची अनुज्ञेयता प्राप्त करण्यासाठी आणखी पात्र आहे. दुसऱ्या शब्दांत, सांगायचे तर, ईओयू स्वच्छेने टीईडी च्या परतावा

मिळण्यासाठी हक्कदार नाही, परंतु आवश्यक त्या कार्यपद्धतीचे पालन केल्यावर डीटीए पुरवठाकाराच्या अनुज्ञेयतेचा फायदा करून घेऊ शकतो. या आधी नमूद केल्याप्रमाणे, परतावायोग्य रकमेवरील व्याज, जर रोख स्वरूपात भरणा केलेला, जरी ईओयू ने परताव्यासाठी अर्ज केला असेल अशा प्रकरणात देखील असे, लागू असलेल्या एफटीपी च्या परिच्छेद ८.५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ६% या दराने सरळ व्याजासह परत करावयास हवे.

४१. पुढील प्रश्न असा आहे की परताव्यासाठी चा दावा कोणत्या प्राधिकरणासमोर मांडण्यात यावा ? सुटचा हक्क व सीमशुल्क उत्पादनाच्या टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा परतावा हा अधिनियम १९९२ च्या तरतुदीपासून व केंद्र सरकारने तयार केलेले एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) धोरण जे अधिनियम १९४४ मध्ये व त्याखाली तयार केलेल्या नियमामध्ये उपबंधित केलेल्या योजनेपेक्षा, निर्यात वाढविण्याच्या व विदेशी चलन मिळविण्याच्या प्रतिज्ञात योजनेसह, एक स्वतंत्र योजना आहे, यातून उत्पन्न होत असल्याने विदेश व्यापार धोरणाची अंमलबजावणी करण्यास जबाबदार प्राधिकरणास संबंधित संस्थांनाच परतव्याची रक्कम मागणी दावे हाताळणे बंधनकारक आहे. कारण ते अधिनियम १९४४ च्या अंतर्गत किंवा नियम २००२ च्या किंवा नियम २००४ खाली परताव्याचे प्रकरण नसून लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खाली आहे.

४२. शेवटी आम्ही असे मत मांडतो कि ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) संस्था ज्यांनी डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून विनिर्दिष्ट माल प्राप्त करून त्याची आयात केली होती त्या ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) संस्था त्यांना त्याकरिता सुरवातीपासूनच एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६. ११ (सी) (ii) खाली मानीव निर्यात म्हणून अश्या दायित्वातून प्रारंभापासून सूट देण्यात आलेली असल्यामुळे शुल्क चुकते केल्याविना ६. २ (बी) मध्ये नमूद असल्याप्रमाणे तसे करण्यास हक्कदार आहेत. याशिवाय लागू आलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) खाली ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ची कोणतीही इतर अनुज्ञेयता नाही. खरे तर एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६.११ (ए) खाली ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडून यथोचित अस्वीकरण प्रस्तुत केल्यावर आणि आवश्यकत्या औपचारिकतेचे

आणि अटींचे पालन करण्याच्या अधीन राहून केवळ डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकारच्या अनुज्ञेयतेचा फायदा करून घेण्यासाठी आणखी पात्र आहे. ते प्रकरण ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) च्या अनुज्ञेयतेचे नसेल तर अशी रक्कम डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पूरवठकारास चुकती केलेली असल्यामुळे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) कडे पुढे सरकवलेले लाभ असेल, जे एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ६. २ (बी) खाली शुल्क चुकते न करता त्याच्या आयात करण्याच्या बंधनासह अन्यथा प्रारंभापासून परिच्छेद ६. ११ (सी) (ii) च्या अनुसार सूट दिल्याचे प्रकरण होते.

४३. याव्यतिरिक्त, जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार तसेच ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ने प्रश्नास्पद माल आयात करण्यासाठी त्यांचा सेनव्हॅट क्रेडिट सममान रक्कम प्रवत्यावर्तीत करण्याच्या स्वरूपात असेल. तथापि जर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी), ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची अंमलबाजवणी करणाऱ्या पारधिकारणाकडून शुल्क परत करण्यात झालेल्या विलंबासाठी ती दरसाल दरशेकडा ६ टक्के व्याजसह, ते ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला तसा लाभ असा परतावा (८.५.१) (वटाव) देणे लागतो परंतु अशा डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराकडे पुढे सरकावणार नाही अशा अटींवर परत मिळू शकतील.

४४. ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करणाऱ्या डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकार, लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या परिच्छेद ८.३ (सी) सह परिच्छेद ८.४.२ आणि ८.५ च्या अंतर्गत त्यात विनिर्दिष्ट आवश्यक त्या औपचारिकत्यांची पूर्तता अधीन टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा प्राप्त करण्यास पात्र आहे. जरी, ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) ला मालाचा पुरवठा करण्याऱ्या डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराच्या प्रकरणात जर टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) चा भरणा सेनव्हॅट क्रेडिटचा वापर करून केला असेल तरी परतावा त्याच्या सेनव्हॅट क्रेडिट खात्यातील सममान रकमेच्या उलट स्वरूपात असेल. जर डीटीए (डोमॅस्टिक टॅरीफ एरिया) पुरवठाकाराने १९४४ च्या कायद्यांतर्गत प्राधिकरणाला टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) ची रक्कम रोख स्वरूपात भरणा केली असेल आणि परिच्छेद ८.५.१ नुसार टीईडी

(टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याला विलंब झाला असेल तर लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणाद्वारे सदर परतावा सरळ व्याजासह दरसाल दरशेकडा ६ % दराने केली जाईल.

४५. दोन्ही प्रकरणांमध्ये, लागू असलेल्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) च्या संदर्भात टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) च्या परताव्याची जबाबदारी १९९२ च्या कायद्यांतर्गत एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) ची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असलेल्या प्राधिकरणाची असेल, ज्याने निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि परकीय चलन मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक असे हक्क/लाभ दिले आहेत. पुढे, संबंधित संस्थेने १९४४ च्या कायद्यांतर्गत आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार प्राधिकरणाकडे परताव्यासाठी अर्ज केला तो अयशस्वी होता, ही वस्तुस्थिती परस्पर अपवर्जक उपाय म्हणून लागू होऊ शकणाऱ्या एफटीपी (फॉरेन ट्रेड पॉलिसी) अंतर्गत टीईडी (टर्मिनल एक्साईझ ड्युटी) परतावा मिळवण्याचा त्याचा हक्क हिरावून घेत नाही. याचे कारण असे करपात्र व्यक्ति फायदेशीर व्यवस्थेचा अधिक लाभ घेण्यास मुक्त आहे.

४६. पक्षांच्या विद्वान वकिलांनी इतर निर्णयांचा संदर्भ दिला होता, जे आमच्या मते या प्रकरणांमध्ये उत्तर वादप्रश्नांशी प्रत्यक्षपणे, विशेषतः लागू असलेल्या एफटीपी नुसार देण्यात आलेल्या सुट शी संबंधित नसल्या कारणाने हाताळण्याची गरज नाही.

४७. वरील बाबी लक्षात घेता, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध निर्धारिती (ईओयू) यांनी दाखल केलेली अपीले वर दिलेल्या अटींनुसार अंशतः यशस्वी ठरतात; आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध विभागाने दाखल केलेली अपीले सुद्धा वर नमूद केलेल्या नुसार अंशतः मान्य करण्यात येतात. खर्चाबाबत कोणतेहि आदेश नाहीत.

एक किंवा एकापेक्षा अधिक प्रलंबित अर्ज, जर असल्यास, तदनुसार, निकाली काढण्यात आले आहेत.

अपीली निकाली काढण्यात आल्या आहेत.

तळटिपांची यादी

[१] दिवाणी अपील क्रमांक ३३५८ आणि ३३५९ /२०२०

[२] २०१६ (३४१) ईएलटी२२ (बॉम्ब.)

[३] संक्षिप्त, "मुंबई उच्च न्यायालय"

[४] दिवाणी अपील क्रमांक ३३६०/२०२०

[५] २०२० (३७३) ईएलटी२१७ (दिल्ली)

[६] दिवाणी अपील क्रमांक ३७०५/२०२०

[७] २०२० (३७१) ईएलटी ६५८ (कर्नाटक)

[८] संक्षिप्त साठी, 'ईओयू'

[९] संक्षिप्त साठी, 'डीटीए युनिट'

[१०] संक्षिप्त साठी, 'टीईडी'

[११] संक्षिप्त साठी, 'आक्षेपित परिपत्रक'

[१२] संक्षिप्त साठी, 'डीजीएफटी'

[१३] संक्षिप्त साठी, "सदर अधिसूचना"

[१४] संक्षिप्त साठी, "एफटीपी"

[१५] संक्षिप्त साठी, "१९९२ चा कायदा"

[१६] संक्षिप्त साठी, 'द सीईएसटीएटी'

[१७] '१९४४ चा कायदा'

[१८] (२०१४) ३०२ ईएलटी २०९ (दिल्ली)

[१९] २००२ (१४३) ईएलटी. २९४ (कलकत्ता)

[२०] उपरोल्लेखित तळटीप क्रमांक १८ वर

[२१] २०१८ (३६१) ईएलटी ४४ (कर्नाटक)

[२२] २००१ (१३२) ईएलटी५४५ (कॅल.)

[२३] उपरोल्लेखीत तळटीप क्रमांक १९ वर

[२४] तळटीप क्रमांक.१८ वर

[२५] (२०१७) ३४६ ईएलटी १२ (मद्रास)

[२६] संक्षिप्त साठी " नियम २००२"

[२७] संक्षिप्त साठी "नियम २००४"

[२८] ५ ए . उत्पादन शुल्कातून सूट देण्याचा अधिकार.— (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एकतर पूर्णपणे किंवा अशा अटींच्या अधीन राहून जर तसे करणे सार्वजनिक हितासाठी आवश्यक असल्याबाबत समाधानी असल्यास, त्यावर सूट देऊ शकते. (निष्कासित करण्याअगोदर किंवा नंतर पूर्ण करणे) अधिसूचनेमध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे, संपूर्ण किंवा त्यावर आकारण्यायोग्य शुल्काच्या कोणत्याही निर्दिष्ट वर्णनाच्या शुल्कपात्र वस्तू:

परंतु, अशा अधिसूचनेत विशेष तरतूद असल्याशिवाय, उत्पादित किंवा निर्मित केलेल्या शुल्कपात्र वस्तूंना त्यातील कोणतीही सूट लागू होणार नाही-

(i) मुक्त व्यापार क्षेत्र किंवा विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये आणि भारतातील इतर कोणत्याही ठिकाणी आणलेले; किंवा

(ii) शंभर टक्के. निर्याताभिमुख उपक्रम आणि भारतात इतर कोणत्याही ठिकाणी आणलेले

स्पष्टीकरण. -या तरतूदीमध्ये, “मुक्त व्यापार क्षेत्र”, “विशेष आर्थिक क्षेत्र” आणि “शंभर टक्के निर्याताभिमुख उपक्रम ” चा अर्थ स्पष्टीकरण 2 ते कलम ३ च्या उपकलम (१) प्रमाणे असेल.

(१-अ) शंकांचे निरसन करण्यासाठी, याद्वारे असे घोषित केले जाते की उपकलम (१) अन्वये कोणत्याही शुल्कपात्र मालाच्या संदर्भात, त्यावर आकारण्यात येणाऱ्या उत्पादन शुल्काच्या संपूर्ण शुल्कातून पूर्णपणे सूट देण्यात आली आहे, तेव्हा उत्पादकाला अशा शुल्कपात्र मालावर शुल्क भरावे लागणार नाही.

भर देण्यात आला

[२९] ब्लॅक्स चा विधी शब्दकोश (११वी आवृत्ती) या मध्ये: लाभ, न. (१४सी) १. काहीतरी देतो तो फायदा किंवा विशेषाधिकार; एखाद्या गोष्टीचा उपयोगी पडणारा किंवा उपयोगी परिणाम <कार ची मालकी असण्याचा फायदा>. २. नफा किंवा लाभ ; विशेषतः. , मोबदला जो वचनाकाडे घेऊन जातो <विक्रीतून मिळालेला लाभ> - कायदेशीर लाभ, कायदेशीर मूय्ये असे देखील म्हणतात.

[३०] ब्लॅक्स चा विधी शब्दकोश (११ वी आवृत्ती): अनुज्ञता (१९ सी) लाभाचा (बहुधा, आर्थिक) जसे कायदेशीर आवश्यकता पूर्ण केल्यावर त्वरित देण्यात येणारी सामाजिक प्रतिभूती, निरपवाद हक्क.

[३१] संक्षिप्तसाठी, "आयसीबी"

[३२] २०१२-२०१३ मध्ये, सुधारणा नंतर, परिच्छेद ८.४., खालीलप्रमाणे आहे :-

"८.४. पुरवठाकारास उपलब्ध असलेले लाभ

वर परिच्छेद ८.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध प्रवर्गाच्या पुरवठ्यांसाठी उपलब्ध असलेले लाभ खालील तक्तात दर्शविले आहे. अशा पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार धोरणाच्या पॉलिसीच्या परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेले लाभ, च्या पैकी जे लागू असेल, त्या लाभासाठी पात्र असेल.

८.२ चे संबद्ध उप-परिच्छेद	परिच्छेद ८.३ मध्ये दिल्याप्रमाणे उपलब्ध असलेले, जे लागू असेल ते, लाभ		
	(ए)	(बी)	(सी)
(ए)	होय (मध्यंतरीच्या पुरवठ्याकरिता)	होय (एआरओ अथवा एका पाठोपाठ पतपत्रानुसार अनुसार)	होय (एआरओ अथवा एका पाठोपाठ पतपत्रानुसार अनुसार)
(बी)	होय	होय	होय
(सी)	होय	होय	होय
(डि)	होय	होय	होय
(एफ)	होय	होय	होय
(एच)	होय	होय	होय
(आय)	होय	होय	होय
(जे)	होय	होय	होय

८.४.१ हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.४ मध्ये दिलेल्या तक्त्यात आलेला आहे.

८.४.२ हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.४ मध्ये दिलेल्या तक्त्यात आलेला आहे.

८.४.३ हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.४ मध्ये दिलेल्या तक्त्यात आलेला आहे.

८.४.४ (i) हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.४ मध्ये दिलेल्या तक्त्यात आलेला आहे.

(ii) हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.२(डी) आणि ८.४ मध्ये आलेला आहे.

(iii) हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.२(एफ) मध्ये आलेला आहे.

(iv) हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.२(एफ) आणि ८.४ मध्ये आलेला आहे.

(v) ८.४.५ गाळून टाकला आहे.

८.४.६ हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.४ मध्ये दिलेल्या तक्त्यात आलेला आहे.

८.४.७ हा परिच्छेद गाळून टाकला आहे कारण या परिच्छेदातील मजकूर वरील परिच्छेद ८.२ आणि ८.४ मध्ये आला आहे.

३३ <u>कलम ५, २०१० मध्ये सुधारणापूर्वी अस्तित्वात होते त्याप्रमाणे :</u>

५. आयात आणि निर्यात विषयक धोरण.- केंद्र सरकार, राजपत्रात अधिसूचनेद्वारे वेळोवेळी आपले आयात आणि निर्यातविषयक धोरण तयार करील आणि ते जाहीर करील. तसेच, त्याच रीतीने त्या धोरणात सुधारणा करील.

<u>कलाम ५ दि. २७.८.२०१० पासून २०१० च्या अधिनियम २५ द्वारे त्या जागी घातल्या प्रमाणे :</u>

५. विदेश व्यापार विषयक धोरण.- केंद्र सरकार, राजपत्रात अधिसूचनेद्वारे निर्यात व आयात विषयक धोरण वेळोवेळी तयार करून जाहीर करू शकते तसेच केंद्र सरकार त्याच रीतीने धोरणात सुधारणा सुद्धा करू शकते.

मात्र केंद्र सरकार विशेष आर्थिक क्षेत्रांच्या बाबतीत, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यांच्या द्वारा विनिर्दिष्ट केले जाईल असे अपवाद, फेरबदल आणि अनुकूलनसह माल, सेवा आणि तंत्रज्ञान यांना विदेश व्यापारविषयक धोरण लागू होईल असे निर्देश देऊ शकेल.

३४ **भारताचे राजपत्र असाधारण**

भाग II, कलम ३, उप-कलम (II) मध्ये प्रकाशित करावयाचे

भारत सरकार

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय

वाणिज्य विभाग

उद्योग भवन

अधिसूचना क्र. ४ (आरई-२०१३)/२००९-२०१४

दिनांकः १८ एप्रिल २०१३

विषयः मानीव निर्यात विषयक योजनेच्या संबंधित एफटीपीच्या परिच्छेद ८.३ (सी) आणि परिच्छेद ८.४ मध्ये सुधारणा - संबंधित.

एस.ओ (ई): विदेश व्यापार (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९९२ चे कलम ५, सुधारल्याप्रमाणे, विदेश व्यापार धोरणा २००९ – २०१४ च्या परिच्छेद १.३ सह , द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकार याद्वारे विदेश व्यापार धोरण, २००९-२०१४ मध्ये खालील सुधारणा करीत आहे.

२. एफटीपी मधील वर्तमान परिच्छेद ८.३(सी) आणि ८.४ च्या जागी खाली दिल्याप्रमाणे सुधारित परिच्छेद ८.३ (सी) आणि ८.४ घालण्यात आले आहेतः

(i) <u>वर्तमान परिच्छेद ८.३ (सी)</u>

"जेथे पुरवठा हा आयसीबी नुसार (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) केला जातो, तेथे टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) तून सूट. इतर प्रकरणांमध्ये, टीईडी चा परतावा दिला जाईल. अग्रीम प्राधिकारपत्र धारकाने दुसरे अग्रीम प्राधिकारपत्र धारण करणाऱ्या निर्माणकास केलेल्या पुरवठ्यासाठी सुद्धा टीईडी उपलब्ध असेल, जर अशा निर्माणकाने आळीपाळीने अंतिम निर्यातकास पुरवठा केला असेल तर."

<u>सुधारीत परिच्छेद ८.३ (सी)</u>

“ जर सूट उपलब्ध नसल्यास टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) चा परतावा दिला जाईल. टीईडी चा भरणा करण्यापासून सूट ही पुरवठयाच्या खालील प्रवर्गांना दिली आहे :

(i) आयसीबी (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) अनुसार पुरवठा;

(ii) अग्रीम प्राधिकारपत्रधारक द्वारे दुसऱ्या अग्रीम प्राधिकारपत्रधारकास, केलेल्या विधिअग्राहयता पत्रानुसार, कलेला दरम्यानच्या मालाचा पुरवठा; आणि

(iii) डीटीए (डोमेस्टिक ट्राफिक एरिया) युनिटद्वारे ईओयू (एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट) / ईएचटीपी (इलेकट्रोनिक्स हार्डवेअर टेकनॉलॉजी पार्क) / एसटीपी (सॉफ्टवेअर टेकनॉलॉजी पार्क) / बीटीपी (बायॉ-टेकनॉलॉजी पार्क) युनिटला मालाचा पुरवठा.

अशाप्रकारे, प्रारंभापासून सूट देण्यात आलेले पुरवठयाचे असे प्रवर्ग टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) चा परतावा प्राप्त करण्यासाठी पात्र राहणार नाहीत.

(ii) <u>वर्तमान परिच्छेद ८.४</u>

वर परिच्छेद ८.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध प्रवर्गाच्या पुरवठ्यांसाठी उपलब्ध असलेले लाभ खालील तक्ता दर्शवितो. अशा पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार धोरणाच्या परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेले लाभ, पैकी जे लागू असेल, त्यासाठी पात्र असेल.

८.२ चे संबद्ध उप-परिच्छेद	परिच्छेद ८.३ मध्ये दिल्याप्रमाणे उपलब्ध असलेले, जे लागू असेल ते, लाभ		
	(ए)	(बी)	(सी)
(ए)	होय (मध्यंतरीच्या पुरवठ्याकरिता)	होय (एआरओ अथवा एका पाठोपाठ पतपत्रानुसार अनुसार)	होय (एआरओ अथवा एका पाठोपाठ पतपत्रानुसार अनुसार)
(बी)	होय	होय	होय
(सी)	होय	होय	होय
(डि)	होय	होय	होय
(एफ)	होय	होय	होय
(एच)	होय	होय	होय
(आय)	होय	होय	होय
(जे)	होय	होय	होय

<u>सुधारित परिच्छेद ८.४</u>

"वर परिच्छेद ८.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध प्रवर्गाच्या पुरवठ्यांसाठी उपलब्ध असलेले लाभ खालील तक्ता दर्शवितो. अशा पुरवठ्याच्या बाबतीत, पुरवठाकार धोरणाच्या परिच्छेद ८.३ (ए), (बी) आणि (सी) मध्ये सूचीबद्ध केलेले लाभ, पैकी जे लागू असेल, त्यासाठी पात्र असेल."

८.२ चे संबद्ध उप-परिच्छेद	परिच्छेद ८.३ मध्ये दिल्याप्रमाणे उपलब्ध असलेले, जे लागू असेल ते, लाभ		
	(ए)	(बी)	(सी)
(ए)	होय (विधिअग्राहयता पत्रानुसार दरम्यानच्या पुरवठ्याकरिता)	होय (एआरओ अथवा एका पाठोपाठ एक पतपत्रानुसार)	(i) विधिअग्राहयता असल्यास स्थितीत सूट (ii) एआरओ अथवा एका पाठोपाठ एक पतपत्र असल्यास परतावा
(बी)	होय	होय	सूट

(सी)	होय	होय	परतावा
(डि)	होय	होय	सूट
(एफ)	होय	होय	(i)सूट (ii) सूट, जर आयसीबी (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग)असल्यास. परतावा, जर आयसीबी (इंटरनॅशनल कॉमपिटेटिव्ह बिडिंग) नसल्यास.
(एच)	होय	होय	परतावा
(आय)	होय	होय	नाही
(जे)	होय	होय	परतावा

३. या सुधारणेचा परिणामः

जेव्हा आरंभापासून सूट उपलब्ध असेल तेव्हा टीईडी (टर्मिनल एकसाईज ड्युटी) च्या परताव्याचा लाभ दिला जाणार नाही.

(अनुप के. पुजारी)

विदेश व्यापार महासंचालक

[३५] तळटीप क्र. २२ येथे उप्परोल्लेखीत

[३६] तळटीप क्र. १९ येथे उप्परोल्लेखीत

[३७] २०१२ (२७६) ईएएलटी ९ (गुजरात)

[३८] २०११ (२६९) ईएलटी १७ (गुजरात)

[३९] तळटीप क्र. १८ येथे उप्परोल्लेखीत

[४०] तळटीप क्र. १९ येथे उप्परोल्लेखीत

[४१] २०१५ (३१७) ईएलटी ४० (मद.)

[४२] तळटीप क्र. २५ येथे उप्परोल्लेखीत

[४३] डब्ल्यू. पी. क्र. २३१९४/२००९ , दि. १६.९.२०१९ रोजी निकाली काढण्यात आले.

[४४] तळटीप क्र.१८ येथे उप्परोल्लेखीत

[४५] २०१५ (३२५) ईएलटी ७२ (डीइएल.)

[४६] २०१८ (३५९) ईएलटी ६३५ (डीइएल.)

[४७] २०१८ (३६०) ईएलटी ९०५ (डीइएल.)

[४८] २०१८ (३६३) ईएलटी ६९ (डीइएल.)

[४९] २०१८ (३६४) ईएलटी ९१ (डीइएल.)

[५०] २०२० (३७३) ईएलटी ९१ (डीइएल.)

[५१] २०२० (३७३) ईएलटी २१७ (डीइएल.)

[५२] तळटीप क्र.२१ येथे उप्परोल्लेखीत

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X–X–X-X